श्री

# कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील पंचमंडळीच्या

# कामाची हकीकत.

(सन १८७७ अक्टोबर पासून तों सन १८८० मे पर्यंत).

---

अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।
तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदन्तिनः ॥
संहतिः श्रेयसी पुंसां स्वकुलैरल्पकैरपि ।
तुषेणापि परित्यक्ता न प्ररोहन्ति तण्डुलाः ॥ १ ॥

---

मुंबईः

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिली.

माहे जुलै, सन १८८० इसवी.

श्री

# कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील पंचमंडळीच्या

# कामाची हकीकत.

(सन १८७७ अक्टोबर पासून तों सन १८८० मे पर्यंत).

अल्पानामपि वस्तूनां संहतिः कार्यसाधिका ।
तृणैर्गुणत्वमापन्नैर्बध्यन्ते मत्तदन्तिनः ॥
संहतिः श्रेयसी पुंसां स्वकुलैरल्पकैरपि ।
तुषेणापि परित्यक्ता न प्ररोहन्ति तण्डुलाः ॥ १ ॥

मुंबई:

"इंडियन प्रिंटिंग" छापखान्यांत छापिली.

माहे जुलै, सन १८८० इसवी.

# कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातींतील पंचमंडळीच्या कामाची हकीकत.

ज्ञातिऐवजाचें संरक्षण व वृद्धी, तसेंच ज्ञातींतील अव्यवस्थेचें निरसन व स्वज्ञातियांची सुधारणा हीं कल्पून प्रतिकूळ पक्षांतलि कांहीं व्यक्ति खेरीजकरून ज्ञातींतील समस्त आबालवृद्धांनीं तारीख २९ माहे जुलै सन १८७७ मित्रवारीं "समापत्र" ह्या नावाचा लेख केला; ज्या पत्राच्या उद्देशावरून, त्यास "स्वस्वत्वपालक" हें नामाभिधान मिळालें आहे. ह्या अमोलिक पत्राच्या उत्पत्तीचें व उन्नतीचें स्पष्टीकरण मागल्या दोन सालांत पंचमंडळीनें जीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत त्यांत यथासांग केलें आहे. पंचमंडळी अती खिन्न आहे कीं दयार्द्र परमेश्वरानें अद्यावत् प्रतिकुळ मंडळीच्या अंतःकरणांत समापत्राच्या उपयुक्ततेविषयीं व महत्वाविषयीं बिजारोपण केलें नाहीं. समापत्राचा उद्देश सार्वजनिक आहे याविषयीं प्रतिपक्षास तिलमात्र संदेह नाहीं; तथापि अकुंचित ज्ञानाचें फल वृथाभिमान, यांत मग्न होऊन पूर्वींचे मानकरी, व त्यांचे अनुयायी यांनीं समापत्र नष्ट करण्यास, व पंचमंडळीचे श्रम निर्फल करण्यास भगीरथ प्रयत्न केले; परंतु सत्याचा कैवारी जो जगदीश त्यास तें सहन न होऊन, त्यांचे सर्व यत्न व्यर्थ झाले. ज्ञातींत सर्वांचें ऐक्य, व परस्परांत स्नेहभाव असावा हा पंचमंडळीचा उद्देश समापत्रांत सकृत्दर्शनींच दाखविला आहे. व तो उद्देश, पंचमंडळीनें समापत्रावर प्रतिपक्षांनी केलेला शेरा कबूल केल्यावरून व्यक्त होतो. समापत्राचा खर्डा होण्यापूर्वीं तेवेळच्या तूर्त नेमिलेल्या मंडळीनें खुद्द स्वतः जाऊन व पत्रद्वारें माजी मानकऱ्यांस बहुआदरानें निमंत्रीलें होतें. तीं पत्रें त्या मंडळीच्या प्रसिद्ध झालेल्या पहिल्या पुस्तकांत सविस्तर दिलीं आहेत. परंतु पंचमंडळीचा मोड हा त्या गृहस्थांचा उद्देश असल्यावरून ते पंचमंडळीच्या एकाही सभेस आले नाहींत इतकेंच नाहीं, तर त्या मंडळीच्या, व आबालवृद्धांच्या सभा भरूं नयेत ह्मणून त्यांनीं अट्टहास केला.

ज्ञातिफंड हा ज्ञातींतील सर्वांचा होय; व त्यावर एकाचा कमी, व दुसऱ्याचा अधिक हक्क असें बिलकूल नाहीं; मग त्यांत गरीबानें १ रुपया किंवा श्रीमंतांनी सहस्र रुपये भरले असोत. असें आहे ह्मणून, नेमिलेल्या वार्षीक खर्चापेक्षां फंडांतून अधिक खर्च करणें झाल्यास आबालवृद्धांची सभा भरून तेथें सर्वांचें अनुमोदन घेऊन तो करावा हेंच योग्य होय. परंतु आपलेच पांच पंधरा आप्त व मित्र गोळा करावे, व सर्व ज्ञातीचा अखत्यार आपणच घेतल्यासारखें दाखवून जो फंड अनेक रितीनें थोड्याबहुत मानानें सर्वांच्या उपयोगी पडणार त्याची मानकरी लोकांनीं हेळसांड करावी हें अनुचीत होय. आपल्या मनांतून कोणास द्रव्यद्वारा साह्य करणें आहे, तर तें आपल्या स्वतःच्याच पैक्यानें करावें; दुसऱ्याच्या ऐपतीवर औदार्य दाखविणें यासारखा दुसरा वेडेपणा नाहीं; आणि त्यांत विशेषेंकरून, जो समुदायाचा ऐवज त्याविषयीं तर समुदायांतील अधिकाऱ्यांनीं फारच सावध असलें पाहिजे.

कोणत्याही मनुष्याच्या नावाचा उल्लेख करण्यास जरी आह्मी इच्छित नाहीं तरी पंचमंडळीच्या कामाचा वृत्तांत लिहितानां तत्संबंधी अगत्याच्या गोष्टी सत्यास अनुसरून लिहिणें अवश्य आहे. रा. बापुजी नारायण मेंगळे यांचें ज्ञातिफंडावर कर्ज निघतें आहे हें ३९ वर्षें ज्ञातींतील एकाही मनुष्यास माहित नव्हतें, व त्याजविषयीं बापुजीनेंही कधीं कांहीं ह्मटल्याचें कोणास श्रुत नाहीं. मयत विश्वनाथ आत्माराम शेट यांजवर फंडासंबंधी माजी सुप्रीम कोर्टांत आणिलेल्या तंट्याचा खर्च भागण्याकरितां ज्ञातींतील कितीएकांनीं वर्गणी काढली होती, व त्या तंट्याचा फैसला झाल्यानंतर नागदेवळाच्या सभामंडपांत भरलेल्या ज्ञातीच्या प्रसिद्ध सभेंत ती वर्गणी भरणारांनीं स्वेच्छेनें शपथ वाहिली कीं, आमची वर्गणी आह्मांस परत नको; व ती आह्मी मागूं लागल्यास तें शिवनिर्माल्य होय. ह्या प्रसंगीं बापुजीही हजर होते. तसेंच सन १८६९ सालांत बापुजीनें ज्ञातीच्या एका प्रसिद्ध सभेंत कोणी न मागतां आपण स्वत: होऊन स्वेच्छेनें ज्ञातींतील मुलांच्या विद्याभ्यासाकरितां रु. १९,००० व ज्ञातींत शिवणधंद्याचा जिर्णोद्धार करण्यास रु० ९,००० असे एकंदर रु० २०,००० देण्याचें कबूल केलें होतें, व तन्निमित्य ज्ञातींतील लोकसंख्येची गणतीही केली होती हें सर्वांस स्मरत असेल. आपलें कर्ज ज्ञातीवर निघतें आहे हें त्या प्रसंगीं देखील त्यानीं सुचविलें नाहीं. त्या विस हजारी औदार्याचा शेवट कसा जाहाला तो सर्वांस अवगत असल्यामुळें येथें सांगणें नलगे. नंतर मध्यंतरी लोकांकडून कार्य प्रसंगी आलेले विडे आपणाजवळच ठेवून घेण्याचा क्रम बापुजीनें सुरू केला; तो सर्वांस न रुचून त्याविषयींचा बंदोबस्त करण्याकरितां मयत कृष्णाजी मुकुंद शेट भोजने व रा. मोरोबा बाळाजी गुजर यांनीं आपल्या नांवें ज्ञातीची सभा भरली होती, तेवेळीं असें ठरलें कीं बापुजीजवळून त्यांनीं घेतलेल्या विड्यांचा हिशेब मागावा, व त्यानीं सर्व विडे ट्रष्टींच्या स्वाधीन केल्यावांचून पुढें बापुजीस कोणी विडा देऊं नये. त्या दिवसापासून ज्ञातींत कार्य प्रसंगीं कित्येक सन्नीधचे आप्त व मित्र खेरीजकरून इतरांकडे बापुजी जाईनातसे झाले; व त्या सर्व ठिकाणीं विडे घेण्याकरितां रा. मोरोबा बाळाजी व ट्रष्टी जात असत. हा अपवाद आहे असें दाखवून तो पुसून टाकण्याकरितां मोरोबा बाळाजी व जयरामजी ट्रष्टी यांच्या साह्यानें बापुजीनें फंडावर १,८०० रुपयांचा कल्पीत दावा उभारिला. व ती रक्कम फंडांतून देण्याकरितां बापुजीच्या आप्त व मित्र वर्गानीं रा. रामकृष्ण नारायण सोमने यांच्या येथें सन १८७७ मे तारीख ७ सोमवार रोजीं सभा भरली होती, व तेथें जें कांहीं घडून आलें तें पंचमंडळीनें छापून प्रसिद्ध केलेल्या पहिल्या पुस्तकांत सविस्तर लिहिलें आहे. ज्ञातींतील अधिकाऱ्यांच्या अशा ह्या लगबगीनें फंड लवकरच जाया होईल हें पाहून ज्ञातींतील विचारी व निस्पृह पुरुषांनीं समापत्र, पंचमंडळी, नियम इत्यादि हल्लींच्या व्यवस्थेचा विचार केला; व प्रतिपक्षांतील कित्येकजण खेरीजकरून सर्व आबालवृद्धांच्या साह्यानें तो प्रवृत्तींतही आणिला. ज्ञातीचें हें सुदैव समजलें पाहिजे कीं जयरामजींचे समट्रष्टी रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांनीं शेवट पर्यंत आपलें सत्व पाळिलें आहे. ह्या सत्वधीर पुरुषानें सन १८६६ पासून ह्मणजे फंड ज्ञातीच्या स्वाधीन येऊन तत्संबंधी ट्रस्टींची नेमणूक झाल्या दिवसापासून असमंजस व स्वार्थबुद्धीच्या

लोकांचे अपशब्द सोसून, तसेच त्यांचे समदृष्टी जयरामजी अंतोबा दिघे यांचीही अलिकडे स दुःसह वक्रदृष्टी व दुराग्रह यांकडे दुर्लक्ष करून, तसेंच आपल्या सन्नीध आप्तांचा फंडा निमित्तें निष्कारण वैर सोसून आपलें उचित कर्तव्य करण्यांत किमपी अंतर पडूं दिलें नाहीं. ह्या प्रसंगी हें ह्मणणें योग्य आहे कीं जरी पांडुरंग हरिश्चंद्रजी सत्कर्मी दृढ निश्चयाचे, बुद्धिमान, व शहाणे आहेत, तथापि त्यांची सुशील, व विचारवंत धर्मपत्नी, हीने त्यांस ह्या कामीं स्तुत्य मदत केली. सत्कर्मीं झटत असतां पुरुषांस अनेक विघ्नें आलीं तत्रापी धैर्य न खचवितां त्यांतून पार पडण्यास सुशिक्षित स्त्रीवांचून कोणाची सल्ला चित्तास आनंद देणारी व हितावह होणार आहे !

अधिकाराच्या बळानें पाहिजे तशी फंडाची वहिवाट करण्याच्या भरीस पडल्यामुळें माजी मानकऱ्यांचा फंडावरील अखत्यार काढून टाकणें ज्ञातीस भाग पडलें; व ते त्या अधिकारासाठीं अजून किती निकरानें भांडत आहेत, हें सर्व आबालवृद्ध स्वदृष्टीनें पाहात आहेत. पंचमंडळीचा मोड करण्याच्या हेतुनें ज्ञातीच्या सभा करण्याकरितां माजी मानकऱ्यांनीं ज्या युक्ती लढविल्या त्या त्यांच्या कारणाच्या निर्बलतेची साक्ष देतात. आपल्या ज्ञातींतील एक गृहस्थ एकदां प्रतिपक्षांच्या सभेस गेला होता. तेथें झालेला प्रकार पाहून तो इतका विस्मित झाला कीं त्याच्यानें तो पंचमंडळीस इत्थंभूत निवेदन केल्यावांचून राहावेना. ह्मणून त्यानें त्या सभेंत झालेला सर्व प्रकार एका कागदावर टांचून पंचमंडळीच्या सभेंत त्या मंडळीच्या परवानगीनें तो वाचिला. तो श्रवण करून सर्वांस सखेदाश्चर्य वाटलें. दुसऱ्याचें ऐकिलेलें किंवा पाहिलेलें हुबेहूब करून दाखविण्याची शक्ति या गृहस्थांत विलक्षण असल्यामुळें त्या निबंधास त्यांनीं हास्यरसप्रधान नाटकाची योग्यता आणली होती. तो निबंध हल्लीं पंचमंडळीच्या दप्तरीं आहे.

पंचमंडळीची विधीपूर्वक नेमणूक करण्याकरितां ज्ञातीची सभा सन १८७७ सप्टेंबर तारीख १६ रविवार रोजीं भरली होती, व त्या सभेचा वृत्तांत त्याच सालांतील विजयादशमीच्या दिवशीं, ह्मणजे तारीख १६ आक्टोबर सन १८७७ रोजीं प्रसिद्ध झाला. त्यानंतर आजदिनपर्यंत ज्ञातीच्या एकंदर सभा ८ झाल्या, व पंचमंडळीच्या एकंदर सभा २८ झाल्या. त्या प्रत्येक सभेंत जीं जीं कामें झालीं तीं सर्व येथें दाखल केलीं असतां विस्तार फार होईल, ह्मणून त्यांतील जितकीं विशेष अगत्याचीं तितकींच संक्षेपानें दाखविलीं असतां ठीक पडेल.

मानकऱ्यांस, ज्ञातीनें पदच्युत केल्याची पंचमंडळीनें वकिलाकडून सन १८७७ आक्टोबर तारीख ८ रोजीं दिलेली इंग्रजी नोटीस तिच्या भाषांतरासहीत परिशिष्टरूपानें मंडळीच्या द्वितीय वृत्तांतांत दिली आहे. त्या नोटिशीचा जबाब त्यांनीं त्याच महिन्याच्या १२ व्या तारखेस पाठविला.

माजी मानकऱ्यांच्या तर्फें आलेल्या त्या नोटिशीवरून स्पष्ट दिसतें कीं जितका, व जोंवर त्यांस ज्ञातीकडून मान मिळावा त्यापेक्षांही ते अधिक बळकाविण्याची लगबग करीत आहेत. ते ह्मणतात कीं आह्मीं मुंबईतील व मुंबईच्या आसमंतात राहाणाऱ्या सर्व कोंक-

गस्थ नामदेव शिंपी ज्ञातीचे मानलेले व कबूल केलेले "अध्यक्ष," "गृहस्थ," व "पुढारी" आहेत. ह्या, व ह्या नंतरच्या, नोटिशींत त्यांनीं आपणास वारंवार अध्यक्ष, गृहस्थ, मानकरी, ज्ञातीचे शिरोमणी व पुढारी इत्यादि ह्मणून घेतलें आहे. हें पाहून सहज हसुं येतें, यांत फारसें नवल नाहीं. त्यांस "अध्यक्ष" ह्या शब्दाचा अर्थ शिकविणें नको. कारण "अध्यक्ष" यापेक्षांही मोठा अधिकारवाचक शब्द असता, तरी तो त्यांनीं या प्रसंगीं आपणास लावून घेतला असता. काय ही महत्वाकांक्षा !! पूर्वापार रितीप्रमाणें ज्ञातीनें कोणास, कोणत्याही प्रसंगीं, व कोणत्याही सभेंत, अध्यक्ष नेमिलें नाहीं; व आपल्या ज्ञातींत अध्यक्ष मुळींच नाहीं. परंतु ४, ५ जणांस मानकरी मात्र केले होते; व ते करण्याचा उद्देश त्यांनीं ज्ञातीचा कळवळा बाळगून ज्ञातीच्या कल्याणाकरितां झटावें हाच होता. व ह्याबद्दल देखील त्यांस ज्ञातीनें वंशपरंपरेनें मानकरी मानावें ह्मणून ताम्रपत्रावर किंवा चर्मपटावर लिहून दिलें आहे असेंही नाहीं. उलटें, मानकऱ्याची ज्ञातिसंबंधी तर काय, पण खासगी वर्तणूक जर अयोग्य असली तर त्यांस तात्काल पदच्युत करीत ह्याविषयीं ह्याच मानकऱ्यांच्या सह्यांचीं जुनीं समापत्रें आहेत. त्या समापत्रांवरून दुसरें असें दिसून येतें कीं मानकऱ्यांचें अयोग्य वर्तन दृष्टीस पडल्यास त्यांस स्थानभ्रष्ट करून त्यांचा मान व अधिकार त्यांच्या मुलांसही मिळूं नये. असें असून, लोक आह्मांस काय ह्मणतील ह्या विचाराकडेही दुर्लक्ष करून "आमचा मानपान व अधिकार वंशपरंपरेनें चालत आला आहे ह्मणून तो ज्ञातीस काढून टाकण्याचा अधिकार नाहीं," ही त्यांचें विलक्षण बुद्धिवैभव प्रकट करणारी कोटी पाहून कोणास आश्चर्य वाटणार नाहीं बरें ! मानकरी तीर्थरूप सुज्ञ होते, परंतु चिरंजीव तसे नाहींत तर त्यास त्याच्या तिर्थरूपाचा मान व अधिकार मिळावा काय ? तसेंच, आपल्या तीर्थरूपाची निस्पृहता, औदार्य व ज्ञातीचा कळवळा पाहून त्यांस ज्ञातीनें विधीपूर्वक मानकरी केला; परंतु त्यांच्या मरणानंतर आपणांत त्यांतील एकही गुण नसतां व आपणास कोणत्याही रीतीनें ज्ञातीच्या कोणत्याही सभेंत मानकरी ठरविलें नसून आपले आपणच होऊन मानकरी व्हावें ह्यांत मोठेपणा तर कसला ! पूर्वी मानकरी, ज्ञातीकडून हा अधिकार मिळाल्यानंतर ज्ञातीकरितां मोठा जेवण समारंभ करून तो अधिकार व मान स्वीकारीत असत; व ज्ञातीच्या कल्याणाकरितां सर्वांचें हितचिंतन हाच आपला धर्म व हेंच आपलें कर्तव्य असें समजून, मोठ्या विनयानें झटत असत. परंतु योग्य कारणावरून ज्यांचा मान व अधिकार ज्ञातीनें काढून टाकिला, अशा मानकऱ्यांनीं हें पक्कें लक्षांत ठेवावें कीं ज्यांनीं आपणांस मान किंवा एखादें पद दिलें त्यांस तें देण्यास जो अधिकार होता त्याच अधिकारानें तो मान त्यांस परत घेतां येतो, अगर तें पद नष्ट करितां येतें. वाणी लोकांच्या महाराजां प्रमाणें वल्लभाचार्यांपासून आमच्या रुसलेल्या मानकऱ्यांची कुलोत्पत्ती असती तर वंशपरंपरेची कोटी कदाचित् साजली असती. बहुतेक मोठमोठे राजे जरी वंशपरंपरेनें राज्य भोगीत आले तरी प्रजापिडन करणाऱ्या राजास पदच्युत केल्याचीं अनेक उदाहरणें आपल्या ऐकिवांत आहेत. असें आहे तर आमच्या यःकश्चित मानकऱ्यांनीं ज्ञातीच्या कल्याणाकडे दुर्लक्ष केलें व फंडावर वक्रदृष्टी धरिली ह्मणून त्यांस ज्ञातीनें

पदच्युत केलें ह्यांत नवल तें कोणतें ! व ह्याकरितां त्यांनीं इतका रुसवा तरी कां बाळगावा !

सन १८७७ आक्टोबर तारीख १४ रोजीं अवमानिलेल्या तिघां मानकऱ्यांनीं उभय ट्रस्टींस अन्नकोट, व दिपवाळींत अनाथांस मिठाईचें साहित्य वांटण्याकरितां रा. मोरोबा बाळाजी गुजर यांच्या स्वाधीन फंडांतून ३०० रुपये करावे अशी चिठ्ठी पाठविली. ज्ञातीनें अवमानिलेल्या मानकऱ्यांची चिठ्ठी ट्रस्टी रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी यांहीं मानिली नाहीं हें ज्ञातीस कळविण्याकरितां ती चिठ्ठी व पांडुरंगजींचे समट्रस्टी जयरामजी दिघे ह्यांचें पत्र, हीं, ह्यांडबिलाच्या रूपानें प्रतिपक्षानें छापिलीं. त्या पत्रकांत रा. मोरोबा फकिरजी ढगे यांच्या येथें ज्ञातीच्या सभा झाल्याचा उल्लेख आहे. आपलेच दहावीस आप्त व स्नेही यांस अनेक आमंत्रणें पाठवून व ते येत नाहींत ह्मणून स्वतः आपणही प्रसंगीं बलावण्यास जाऊन त्यांस एका ठिकाणीं गोळा करणें, हीस ज्ञातीची सभा ह्मणतात काय ? सदरील पत्रें छापिलीं होतीं ह्मणून तीं येथें प्रसिद्ध करणें नको. वरील पत्रांचा जबाब ट्रस्टी पांडुरंगजी यांनीं सन १८७७ आक्टोबर ता. २० रोजीं दिला तो येणेंप्रमाणें:—

MESSRS. KRISTNAJEE MACCOONDJEE, BAPOOJEE NARAYEN AND MOROBA BALAJEE.

SIRS,

With reference to your letter of the 15th Instant addressed to myself and my co-trustee, Mr. Jairam Antoba, requiring us to pay out of the Caste Fund the sum of Rupees (300) three-hundred to Messrs. Wassoodew Balajee, Kristna Succaram and Moroba Balajee to enable them to distribute on account of Dewali holidays, grain, ghee, sugar &c. among the poor and destitute of our Caste, I have to state that as you have been deposed by the Caste as Mankurrees of the Shimpee Community, your right to exercise any such authority has entirely ceased, and I therefore on my part decline to act upon your order.

Dated this 20th day of October 1877.

Your's truly

(Signed) PANDOORUNG HURRICHAND,

Trustee.

( वरील पत्राचा सारांश ).

त्रिवर्ग मानकऱ्यांस ज्ञातीनें पदच्युत केलें आहे ह्मणून ज्ञाती संबंधी त्यांजकडे कोणताही अधिकार राहिला नाहीं; यासाठीं त्यांची तीनशें रुपयांबद्दलची चिठ्ठी पांडुरंगजी ट्रस्टी मानीत नाहींत.

त्याच रोजीं पांडुरंगजी ट्रस्टी यांनीं आपले बंधु ट्रस्टी जयरामजी यांस एक इंग्रजी पत्र पाठविलें, त्याचा सारांश हा कीं, ज्या मानकऱ्यांचा मानपान व अधिकार ज्ञातीनें बंद केला आहे त्यांची तीनशें रुपयांची चिठ्ठी मी कबूल करणार नाहीं, व ती तुह्मी ( जयरामजी ट्रस्टी यांनीं ) ही कबूल करूं नये; परंतु अनाथांस वार्षिक मिठाई वांटण्याबद्दल पंच-

---

१ पंचमंडळी फार दिलगीर आहे कीं ह्या ज्ञातिबंधुस गेल्या नोव्हेंबर महिन्याच्या २६ व्या तारखेस देवाज्ञा जाहाली. ज्ञातींत सर्वांचें ऐक्य व्हावें हें आज ६ महिने या गृहस्थाच्या मनांत फार वागत होतें, व त्याकरितां त्यांनीं आपले यत्नही सुरू केले होते. ईश्वरकृपेनें जर हे कांहीं दिवस वांचते तर त्यांचा हेतु व प्रयत्न सफल होते.

मंडळीनें जी चिठी पाठविली आहे तीच आपण मानिली पाहिजे. आणि जर जयरामजी पंचमंडळीची अवगणना करतील, तर पांडुरंगजी आपल्या जवळ असलेल्या ज्ञातीच्या ऐवजांतून पंचमंडळीच्या चिठी बरहुकूमरुपये २५० पावेतों देतील.

पंचमंडळीनें २०, ५८, व ६६ व्या नियमांप्रमाणें सन १८७७ आक्टोबर ता. २० रोजीं उभय ट्रस्टींस अनाथांस दिपवाळींत मिठाईकरितां, व अन्नकोटाकरितां रुपये २५० पर्यंत त्यांस जसा योग्य दिसेल तसा खर्च करावा असें पत्र लिहिलें.

पांडुरंगजींच्या पत्राचा व पंचमंडळीच्या आक्टोबर ता. २० च्या चिठ्ठीचा जबाब जयरामजीनें त्याच महिन्याच्या २२ व्या तारखेस आपल्या वकीलाकडून पाठविला, त्याचें तात्पर्य पंचमंडळीनें सन १८७७ नोवेंबर ता. २१ रोजीं आपल्या वकीलाकडून जें उत्तर पाठविलें त्यांत स्पष्ट दिसतें. ह्या नोटीशींत प्रतिपक्षाच्या अक्टोबर ता. १२ व २२ च्या पत्रांचा जबाब वाळला आहे.

सर्वांस ही गोष्ट माहीत आहे कीं मयत चंदु रघुनाथजी ढगे यांनीं सन १८७२ सालांत मुंबईंतील हैकोर्टांत २४१ नंबरचा मुकदमा १८,६९३ रुपये वसूल करण्याकरितां आणला होता, त्यांत प्रतिवादी बापूजी नारायण मेंगळे, कृष्णाजी मुकुंद शेट भोजने, पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने, जयरामजी अंतोबा दिघे, व कांहीं इतर मंडळी होती. बापूजी व दुसरे एक दोघे खेरीजकरून प्रतिवाद्यांच्या मनांतून चंदु शेटचे रुपये देवूं नये असें होतें. ह्या तंट्यांत रा. मोरोबा बाळाजी गुजर व रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांनीं सन १८७३ एप्रिल ता. ७ रोजीं प्रतिज्ञालेख केला आहे; त्यांत त्यांहीं शपथ घेऊन ह्मटलें आहे कीं चंदु शेट यांचें बिलकुल घेणें निघत नाहीं, व त्यांस आह्मी कोणीही विश्वनाथावर तंटा चालविण्याकरितां अधिकार दिला नव्हता; आणि त्यांनीं जो कांहीं खर्च केला तो आपल्या स्वतःच्या जोखमावर केला. तसेंच त्या तंट्यांत सन १८७३ जून तारीख ४ रोजीं उभय ट्रस्टीं रा. जयरामजी अंतोबा दिघे व रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांनीं एकत्र आफिडेविट ( प्रतिज्ञालेख ) केला आहे, त्यांत जयरामजीनीं शपथ घेऊन साफ ह्मटलें आहे कीं बापूजी नारायण हे चंदु शेट यांस ह्या तंट्यांत मसलत देत असतात, व कोर्टानीं फर्माविल्याप्रमाणें कृष्णाजी मुकुंद शेट भोजने व मोरोबा बाळाजी गुजर यांनीं आपल्या स्वतः दोघांच्या नांवानें कृष्णाजी भोजने यांच्यायेथें ज्ञातीची सभा भरली होती व तेथील ठराव टिपून घेण्याकरितां इंग्रज वकील मि. जड्ज यांसही आणिलें होतें; तेवेळीं चंदू शेटच्या दाव्याविषयीं असें ठरलें कीं ज्ञातीच्या मनांतून चंदू शेटनां ज्ञातिफंडांतून रुपये देणें नाहीं, आणि फंडावर आतां कोणाचा दावा राहिला नाहीं असें सन १८६५ फेब्रुवारी तारीख ६ रोजीं केलेल्या कोर्टाच्या हुकुमावरून दिसतें. तसेंच कृष्णाजी मुकुंदशेट भोजने यांनीं पण याच तंट्यांत सन १८७३ फेब्रुवारी तारीख १० रोजीं जो प्रतिज्ञा लेख केला आहे त्यांतही जयरामजी ट्रस्टी व मोरो बाळाजी यांच्याच प्रमाणें शपथ घेऊन ह्मटलें आहे. कृष्णाजी मुकुंदशेट यानीं आपल्या नांवानें आबालवृद्धांची सदरील सभा भरण्याकरितां छापील निमंत्रणपत्र काढिलें होतें तें असें:—

## निमंत्रण पत्र.

### कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळी.

मंगळवार तारीख १९ एप्रील सन् १८७३ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां सदरीं लिहिलेल्या मंडळींतील सर्व अबालवृद्धांची सभा रा. रा. कृष्णाजी मुकुंद शेट भोजने यांच्या सदरेंत भरणार आहे. सभेचा उद्देश रा. चंदु रघुनाथ शेट ढगे यांनीं हल्लीं जातींतील कित्येक गृहस्थांवर फिर्याद केली आहे त्या विषयीं विचार करण्याचा आहे. हा मुकदमा नंबर २४१–१८७२ चा गेल्या मंगळवारीं तारीख ८ एप्रील रोजीं नामदार हैकोर्टापुढें निघाला होता परंतु ह्याचा विचार जातींत व्हावा ह्या इच्छेनें चालुत्या महिन्याच्या १९ वे तारखे पर्यंत कोर्टानें तो मुकदमा तहकुब ठेवला आहे.

सभेस नेमलेल्या वेळेस सर्व अबालवृद्धांनीं अवश्य यावें ही ह्यांस विनंती आहे.

मुंबई माहे एप्रील
तारीख ११ सन १८७३.

कृष्णा मुकुंदजी शेट.
मोरोबा बाळाजी.

---

ह्या सभेंत प्रतिपक्षांतील एका तामसी मनुष्यानें सभा भरविणारे कृष्णा मुकुंद शेट व मोरोबा बाळाजी ह्यांवर शिव्यागाळीची इतकी वृष्टी केली कीं त्याविषयीं तेथें सर्वांस फारच वाईट वाटलें. परंतु या दोघां त्यावेळच्या मानकऱ्यांनीं तो वर्षाव निमुटपणें सहन केला हेंच आश्चर्य होय. नीच मनुष्याच्या गालिप्रदानास मुळींच उत्तर देऊं नये ही जरी नीति आहे, तरी मानकऱ्याच्या अधिकारानें ज्ञातीची सभा भरून त्यांत द्वेषबुद्धीनें गाळी देणारास ज्ञातीच्या पूर्वापार चालत आलेल्या नियमास अनुसरून योग्य शिक्षा देणें हें त्यांचें कर्तव्य होतें. परंतु तो तामसी मोरोबा बाळाजी यांचा आप्तविषयी असल्यामुळें ती अपशब्दांची सर्व लाखोली शेटजीनीं पुष्पवृष्टी समजून घेतली. भर सभेंत असल्या निष्कारण झालेल्या अपमानाचा किंचितही मनांत खेद न बाळगून, बापूजींच्या कल्पित दाव्या निमित्य त्यास कांहीं द्यावें हा आपला दुराग्रह ज्ञातीनें चालू दिला नाहीं ह्मणून, पंचमंडळीचे हेतू व प्रयत्न ज्ञातीस हितावह आहेत हें स्वमुखानें कबूल करीत असतांही त्या मंडळीच्या प्रयत्नास बुद्धया अरिष्ट आणण्यास झटणें हें आमच्या मोरोबा शेटजीस शोभतें काय ? मोरोबा शेट गुजर व ट्रस्टी जयरामजी दिघे यांचे वर दर्शविलेले प्रतिज्ञालेख, व ट्रस्टी रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी व चिटणीस शिवशंकर मलोजी यांस त्यांनीं आपल्या वकीलाकडून लिहीविवलेलीं वरील पत्रें हीं समग्र येथें एकाच ठिकाणीं, ह्मणजे एकाजवळ एक, अशीं भाषांतरासहीत प्रसिद्ध केलीं असतां आमच्या माजी मानकऱ्यांची सत्यनिष्ठा कितपत शोभवितील हें आह्मांस सांगणें नलगे. परंतु त्यांस इतकें विचारलें पाहिजे कीं, गृहस्थहो, आपण आपल्या वकीलाकडून जें लिहीविवलें आहे तें प्रतिज्ञेनें, ह्मणजे शपथपूर्वक, आपणास प्रसंग पडल्यास कोर्टांत ह्मणण्यास धैर्य होईल काय ? जेथें शास्ता जवळ नाहीं तेथें पुष्कळ वल्गना करितां येतात. यावरून समस्त आबालवृद्धांच्या लक्षांत येईल कीं, ट्रस्टी पांडुरंगजी व चिटणीस शिवशंकर मलोजी यांजवर

चंदुशेटच्या दाव्यासंबंधी फंडाचें नुकसान केल्याचा जो आरोप आणला आहे तो प्रतिपक्षांतील मुख्यांच्या द्वेषबुद्धीचा प्रभव होय.

प्रतिपक्षाचें दुसरें असें ह्मणणें आहे कीं, पूर्वीं सुप्रीम कोर्टांत [१]वुलियम हावर्ड व विश्वनाथ आत्माराम यांचा जो तंटा पडला होता त्या तंट्यामुळें बापूजींचा व दुसऱ्या कांहीं मंडळीचा पुष्कळ लोक द्वेष करूं लागले आहेत. हें ह्मणणें कितपत खरें आहे याविषयीं इतकें ह्मणणें पुरे आहे कीं विश्वनाथजींचे शालक माजी मानकरी मोरोबा बाळाजी व त्यांचे अनुयायी जयरामजी ट्रस्टी हे पूर्वीं विश्वनाथजींच्या पक्षास असून त्यांनीं त्याजकरितां मोठ्या निकरानें लढाई केली, आणि आतां बापूजींचा पक्ष स्वीकारून सर्व उलट गोष्टी आपल्या वकीलाकडून लिहविवतात. प्रतिपक्षाचें आश्चर्यकारक दुसरें ह्मणणें असें आहे कीं त्यांच्यांतील बहुतेकांनीं व त्यांच्या वडिलांनीं व बापू नारायण यांनीं हा ज्ञातिफंड उभारून त्यांत मोठमोठ्या रकमा भरल्या, व ज्या आबालवृद्धांनीं समापत्रावर सह्या केल्या आहेत त्यांपैकीं कोणी किंवा त्यांच्या वडिलांनीं फंडांत एक रुपयाही भरला नाहीं. हें भाषण कितपत लटकें आहे हें खालीं दर्शविलेल्या नांवां व आंकड्यांवरून लक्षांत येईल. ज्या लेखावरून हीं नांवें व आंकडे घेतले आहेत तो अव्वल लेख सुप्रीम कोर्टांत तंट्याच्या वेळीं दाखल केला आहे व त्या लेखाची तारीख १९ मार्च सन १८२३ आहे.

| | |
|---|---|
| निळाजी अनंत शेट ... ......... | २५-०-० |
| नारायण शेट मेंगळे... ... ...... | ०-०-० |
| मुकुंदशेट भोजने यांची रणसोड कल्याण याजवर आत्माराम शेटीस १ हुंडी ............... ... | २,००५-०-० |
| आत्माराम शेट सदावर्ते... ... ... | ६,५०१-०-० |
| तुळाजी शेट भोजने... ... ...... | २०१-०-० |
| जयरामजी शेट गोरे ............ | ५०१-०-० |
| माणीकजीशेट ढगे............... | ५०१-०-० |
| मल्हार शेट.................... | २२५-०-० |
| सदोबा शेट गाठे ............... | १५१-०-० |
| सखाराम शेट चंदन... ......... | ४०१-०-० |
| काशिनाथ बाबाजी शेट ....... ... | ५१-०-० |
| भाऊ बाळाजी शेट सदावर्ते......... | २५-०-० |
| भास्करजी डोळस ............... | १५-०-० |
| भास्करजी भोजने ............... | १५-०-० |
| नारोबा शेट..................... | २५-०-० |
| भगवान शेट... ... ............ | ७५-०-० |
| हरबाजी शेट बदले............... | २१-०-० |
| जयराम शेट भुरू ............... | २५-०-० |
| अंतोबा वाग शेट गोरे........... | १५-०-० |
| अंतोबा विठोबा शेट नाईक ... ... | २५-०-० |
| कुसाजी झुगाजी.................. | २५-०-० |
| बाळाजी त्रिंबकजी आवासंख... ... | १५-०-० |
| खंड शेट...................... | २५-०-० |
| हरबाजी बावन शेट दगे........... | १५-०-० |
| माधवजी गवार शेट सदावर्ते........ | २५-०-० |
| बाळाजी दामुल शेट मुरांजण...... | १०१-०-० |
| भिकाजी शेट सदावर्ते ........... | १०१-०-० |
| धोंडशेट नाईक............... .. | १२५-०-० |
| रामजी पिलाजी शेट नाईक ... ... | १०१-०-० |
| आत्माराम नाईक................ | १०१-०-० |
| भिकाजी शेट गुजर.............. | ५१-०-० |
| केशवजी रणसोडजी भोजने ... ... | १०५-०-० |
| नामशेट गोरे .................. | ५१-०-० |
| फकिरजी दत्ताजी ढगे............ | ५१-०-० |
| गंगाधरजी रामशेट किरावंत....... | ५१-०-० |
| बाळाजी त्रिंबकजी गुजर ......... | ५१-०-० |
| जनाजी कामशेट खेडेकर ........ | ७५-०-० |
| भास्कर जगन्नाथजी खेडेकर ... ... | २५-०-० |
| यादवशेट मेंगळे २५............. | ७५-०-० |
| गणेशजी मेंगळे ................ | १५-०-० |

१ धर्मादाय तंट्यांत वादी बरोबर सरकारही वादी होत असतें. ह्मणून त्या वेळचे आडव्होकेट जनरल वुयालियम हावर्ड हे चंदु रघुनाथ, हरिश्चंद्र बाळाजी, व दिना मोरोबा यांजबरोबर ह्या तंट्यांत वादी झाले होते.

| | | | |
|---|---|---|---|
| हिराजी शेट हंबीर.............. | २५-०-० | नरसुजी नाईक यांची विधवा ठकुबाई. रणसोड कल्याण याजवर आत्माराम शेटीस १०० रुपयांची हुंडी....... | १०१-०-० |
| सदोबा शेट डोळस............... | ५१-०-० | | |
| मुकुंदजी हिराजी हंबीर............ | १५-०-० | | |
| लक्ष्मणजी शहाणे................. | १५-०-० | साजुबाई व गंगाबाई भुरु. रणसोड कल्याण यावर आत्माराम शेटीस हुंडी. | ५०१-१-७ |
| बंभुजी खर्डे...................... | १५-०-० | | |

ह्यावरून समस्तांची खात्री होईल कीं फंडांत बहुतेक रकमा समापत्रावर सह्या केलेल्यांच्या वडिलांनीं भरल्या आहेत, परंतु बापूजी किंवा त्यांचे तीर्थरूप यांनीं एक रुपया देखील भरलेला नाहीं. या टिपेंत नारायणशेट मेंगळे ( बापूजींचे तीर्थरूप ) यांचें नांव मात्र आहे, परंतु त्यांच्या नांवावर एक रुपया दिसत नाहीं. तसेंच मुकुंद शेट भोजने ( मयत कृष्णाशेट यांचे तीर्थरूप ) यांच्या नांवावर ह्या टिपेंत ३,००९ रुपये आहेत. त्या रुपयांबद्दल त्यांनीं आत्माराम बाळाजी शेट यांस रणसोड कल्याण यांवर एक त्या रकमेची हुंडी दिली होती व ती आह्मांस चांगल्या आधारावरून कळलें आहे कीं वसूल झाली नाहीं. असा प्रकार असून बापूजीनें किंवा त्यांच्या वडिलानें फंड उपस्थित केला व त्यांत रकमा भरल्या हें प्रतिपादन करण्यास झटणें हें मानकऱ्यांची आढ्यता मिरविणाऱ्यास शोभत नाहीं.

ज्ञातींत किंवा दुसऱ्या कोणत्याही समुदायांत अव्यवस्था असणें ह्यास अज्ञान कारण होय. विद्येच्या प्रसारानें अज्ञान नाहींसें होऊन ज्याचें त्यास बरेंवाईट कळूं लागून प्रत्येकजण आपली स्थिति सुधारण्यास प्रयत्न करील. आजपर्यंत ज्ञातीच्या सुधारणेचें एक तरी कोणतें काम आमच्या मानकऱ्यांपैकीं कोणी केलें आहे काय? आपल्यापासून जर होत नाहीं, तर दुसरे तसें करूं लागल्यास त्यांस अटकाव करणें, हें कोणत्या मनुष्याचें काम बरें! फंडांतून वार्षिक कित्येक निरुपयोगी खर्च बरेच होतात, परंतु ज्ञातींतील अनाथ विद्यार्थी मुलांकडे कोणी लक्ष पोहोंचविलें आहे काय? आज सुमारें १८ वर्षां पूर्वीं ( सन १८६१ आगष्ट महिन्यांत ) आमचे ज्ञातिबंधु रा. दिनाजी मोरोबा पतंगे यांनीं श्रम करून ज्ञातींतील मुलांकरितां सरकाराकडून नागदेवीच्या आळींत एक मराठी शाळा स्थापन करविली, व याकरितां त्यांस आरंभी द्रव्यखर्चही करावा लागला. जोंपर्यंत ते मुंबईंत होते तोंपर्यंत त्या शाळेच्या उत्कर्षार्थ त्यांनीं बरेच प्रयत्न केले, व ती शाळा ॲंग्लो व्हर्न्याक्युलर करण्याच्या तजविजींत होते. परंतु नोकरीच्या संबंधानें ते सन १८६६ सालांत पुण्यास गेल्यापासून आमच्या ज्ञातिबांधवांपैकीं कोणाच्याही हातून मुलांची देखरेख होत नाहीं. ज्ञातींतील अनाथ विद्यार्थी मुलांस फंडांतून साह्य मिळावें ह्मणून सन १८७६ सालीं रा. भवानी रामकृष्ण सोमने व शिवशंकर मलोजी चवाथे यांनीं नागदेवी सरकारी शाळेंत ज्ञातीची सभा भरविली होती; तेथें जो प्रकार झाला तो खालीं दर्शविलेल्या पत्रांवरून लक्षांत येईल:—

मुंबई तारीख ८ माहे एप्रिल सन १८७४.

**राजमान्य राजश्री चंदु रघुनाथ ढगे, जयराम अंतोबा दिघे, व पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने, कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातिफंडाचे ट्रस्टी यांस.**

महाराज,

आपल्या ज्ञातींत बरींच गरीब व निराश्रित विद्यार्थी मुलें आहेत हें आपणास माहीतच आहे. ह्या मुलांचा विद्याभ्यास, द्रव्याची मदत नसल्यामुळें, न वाढतां त्यांस आपदा भोगाव्या लागतात. त्यांस विद्यामृत मिळून त्या आपदा दूर व्हाव्या ह्मणून त्यांस ज्ञातीकडून साह्य मिळणें हें योग्य होय; व तें साह्य ज्ञातिफंडांतून मिळावें असें आपणांतून बहुतेकांच्या मनांत आलें आहे. परंतु तें फंडांतून कोठपर्यंत मिळण्याचा संभव आहे हें पक्कें समजल्यावाचून त्याजप्रित्यर्थ ज्ञातींतील मानकरी गृहस्थांकडेस अर्ज करणें व्यर्थ दिसतें. ह्मणून आपणास हीच विनंती आहे कीं, आपल्याजवळ हल्लीं ज्ञातीचा ऐवज किती आहे, व त्याचें दरसाल काय उत्पन्न येतें, व त्यांतून किती, व तें कोणत्या प्रकारें खर्चलें जातें हें विगतवार लेखीं आपल्या सहीनिशीं जितकें बनेल तितकें लवकर कळवावें. आपल्याकडून इच्छित जबाब आल्यावर निराश्रित विद्यार्थी मुलांच्या साह्यार्थ त्वरित प्रयत्न केला जाईल.

आपला आज्ञांकित सेवक,

**शिवशंकर मलोजी.**

---

वरील पत्रांत मागीतल्याप्रमाणें रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी ट्रस्टी यांनीं हा पुढील आंकडा पाठविला.

॥ श्री ॥

श्री कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातिफंडाचा सन १८७४ रा पासून पुढील अदमासे जमाखर्चाचा ताळा येणेंप्रमाणें :—

७०१॥ जमा. सरकारी लोनचें व्याज.

४८१॥ ———— १०,७००×४॥

२२० ———— ४,०००×५॥

१९० टिळेविडे जर बरोबर आले तर.

———

८९१॥

२४ कथा ४.

१९ दिपवाळी निमित्य देवळांत.

२०० गरीबांस दाणा.

२४ रामनवमी व गोकुळाष्टमी.

१॥ महालक्ष्मीचे दिपमाळीचा खर्च.

१४ वाड्या २.

८० शिमग्याचा खर्च,

४० होळीचा इत्यादि.

४० नायकीणीस.

———

६० गंगाधर विठोबाचा पगार.

४० गरीबांचे लग्नास.

४० अनाथ प्रेतसंस्कारार्थ.

———

४९८॥

रुपये ३९० कदाचित् दरसाल वांचविले जातील.

P. H.

मुंबई, तारीख १ ली, माहे मे सन १८७४.

महाराज,

तारीख ३ री माहे मे सन १८७४ रविवार रोजीं सकाळचे सात वाजतां सरकारी नागदेवी मराठी शाळेंत त्या शाळेंतील मुख्य शिक्षक रा. रा. बाळयज्ञेश्वर पाध्ये हे शाळेसंबंधी कांहीं भाषण करून शिंपी ज्ञातींतील तरुणांच्या ज्ञानवृध्यर्थ उपयुक्त सूचना करणार आहेत. त्याच प्रसंगीं आपल्या ज्ञातींतील अनाथ विद्यार्थी मुलांच्या साह्यार्थ प्रयत्न करण्याचा विचार केला जाईल. अशा प्रसंगीं जात्याभिमानी सर्व आबालवृद्धांनीं एकत्र जमावें ह्मणून आपणास हें निमंत्रण पत्र पाठविलें आहे; तर कृपा करून सदरहू ठिकाणीं नेमलेल्या वेळीं आपण यावें हीच प्रार्थना आहे.

आपले आज्ञाधारक सेवक,
शिवशंकर मलोजी.
भवानीरामकृष्ण.

---

॥ श्री ॥

**राजमान्य राजश्रीं कृष्णाजी मुकुंद शेट भोजने, बापुजी नारायण शेट मेंगळे, मोरोबा बाळाजी शेट गुजर, व नानाभाई विश्वनाथ शेट सदावर्ते, कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळींतील मानकरी गृहस्थ यांस.**

विनंती विशेष,

१. आपल्या ज्ञातींतील गरीब व निराश्रित विद्यार्थी मुलांस फंडांतून मदत मिळावी य हेतूनें आपणास हा अर्ज केला आहे.

२. ज्ञातींतील बहुतेक विद्यार्थी मुलांची स्थिति दुःखकारक आहे हें आपणास अवगत असेलच. त्यांचे आईबाप निर्धन असल्यामुळे त्यांच्यानें मुलांच्या विद्येचा खर्च भागवत नाहीं. शाळेंत साहाव्या यत्तेपर्यंत मुख्यत्वेंकरून मुलांस पुस्तकांची व शाळेंतील फीची थोड्याच मानानें गरज लागते. परंतु त्या क्षुल्लक गोष्टींचीही पूर्तता त्यांच्या आईबापांकडून होत नाहीं. ह्मणून मध्येंच मुलांस शाळा सोडावी लागते, व असें झालें ह्मणजे अर्थात् त्यांची विद्या न वाढतां त्यांस जन्मपर्यंत अज्ञान व दुःख ह्यांत रहावें लागतें. अशीं हल्लीं ज्ञातींत पुष्कळ उदाहरणें सांपडतात. सरकारानें विद्या सर्वांस सुलभ करून ठेविली आहे; व तिची प्राप्ति अनेक जातींतील शेंकडो लोक करून घेत आहेत. परंतु ही मोठी सखेदाश्चर्याची गोष्ट आहे कीं, आपल्या ज्ञातींत प्रवेश परीक्षे योग्य झालेला असा एकही मुलगा सांपडत नाहीं. येथपर्यंत जर त्यांचा अभ्यास झालेला नाहीं, तर मोठमोठ्या पदवीच्या परीक्षेंत पसार होतील ही आशा करणें व्यर्थ आहे. परंतु असें होण्यास द्रव्याची मदत मुख्य कारण आहे. ज्ञातींत अशीं मुलें सांपडतील कीं ज्यांना द्रव्यसाह्य मिळाल्यास तीं पूर्ण अभ्यास करितील, व शास्त्रीय विषयांमध्यें प्रवीण होऊन स्वतंत्रपणें आपली उपजीविका चालवितील. असें झालें असतां त्याचें श्रेय गृहस्थहो, आपणासच मिळेल.

३. सुदैवें ज्ञातिऐवज सुमारें १९,००० शिल्लक आहे, व तो चिरकाल सुरक्षित राहील ह्याविषयीं आह्मांस आतां तिळमात्र संशय नाहीं. राजश्री पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने, ज्ञातिफंडाचे एक ट्रस्टी, यांनीं फंडाचा १८७४ सालच्या उत्पन्नाचा व खर्चाचा आंकडा दिला आहे ( व जो या अर्जांत भिडलेला आहे ) त्यावरून स्पष्ट दिसतें कीं खर्च भागून वर्षाअंतीं उत्पन्नांतून ३५० रुपये शिल्लक राहाते. लोक पूर्वींप्रमाणें पुरे विडे देऊं लागतील तोंपर्यंत, आंकड्यांत दाखविल्याप्रमाणें विड्याचें दरसाल १५० रुपये उत्पन्न होईल असें दिसत नाहीं; तथापि हल्लींप्रमाणें अपूरते विडे येवूं लागले तरी कनिष्ट ७५ रुपये विड्यापोटीं उत्पन्न होण्यास हरकत नाहीं. तेव्हां ह्या मानानें वर्षास उत्पन्नाची शिल्लक २७५ रुपये खास राहाते.

४. सदरहू आंकड्यावरून दुसरें असें दिसतें कीं दर वर्षास गोरगरीबांस धान्य वांटण्यास २०० रुपये फंडांतून दिले जातात. तसेंच गरीबांच्या हव्यकव्यास फंडांतून सुमारें ८० रुपये देण्यांत येतात; वरकड शिमग्याचा खर्च, जो विड्यांच्या रुपयांतून होत असे, तो फंडांतून सुमारें ८० रुपये अलिकडेस देवविला जातो. अशा अनेक कारणीं फंडाचा उपयोग होत असतां ज्ञातींतील मुलांच्या साह्यास त्यांतून कांहींच मिळूं नये ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. विचारपूर्वक पाहिलें असतां फंडांतूत पहिल्यानें मदत विद्यार्थी मुलांस करावयाची होती; कारण त्यांचें पुढील उपजीवन व सुख, तसेंच त्यांच्या हातून ज्ञातींतील कियेक अपंग लोकांचें साह्य व ज्ञातीची सुधारणा त्यांच्या विद्येवर अवलंबून आहे; तीं मुलें जर विद्वान होतील तर सहसा दुर्गुणी होणार नाहींत, व ज्या दुर्व्यसनानीं ज्ञातींतील कियेकांस दैन्य व रोग आणीला आहे त्या व्यसनां पासून ते दूर रहातील. व त्या व्यसनाचें निर्मूलन करण्यास झटतील. ह्या विषयीं येथें व्याख्या करणें नको. गृहस्थहो. आपल्या सोज्वल बुद्धीस हें स्पष्ट दिसतच आहे कीं सर्व दानांत विद्यादान हें श्रेष्ठ आहे, व हें दान बहुतांशीं द्रव्याधीन आहे. आपल्या ज्ञातींत असे श्रीमंत व उदार थोडेच सांपडतील कीं जे आपल्या द्रव्यबळानें कियेक अनाथ विद्यार्थी मुलांच्या निर्वाहाचा पत्करा घेतील. अन्य ज्ञातींत असे उदार व श्रीमान बरेच सांपडतात. अस्तु. तरी ह्या दुःखांत सुख मानण्यास एक मोठें कारण आहे कीं ज्ञातीचा स्वतंत्र ऐवज सुमारें १९,००० रुपये आहे, ज्यांतून आपण मनावर घेतल्यास बऱ्याच मुलांच्या विद्येस साह्य मिळणें आहे. हा आश्रय जीं मुलें वास्तविक निराश्रित व निर्धन आहेत व ज्यांचा कल विद्येकडेस आहे त्यांसच मिळावा. इतरांस तो आश्रय देणें हें जसें अयोग्य आहे तसेंच त्यांनीं तो मागणें हें त्यांस लाजीरवाणे होय.

५. मुलांस विद्याधन संपादून देण्याच्या कामास जितका पैसा खर्च केला तितका थोडाच आहे, व तो सद्व्यय आहे ह्याविषयीं संदेह नाहीं. ह्मणून व्याजाच्या उत्पन्नांतून सर्व योग्य खर्च भागून जी शिल्लक राहील ती आपण कृपाळू होऊन निराश्रित मुलांच्या विद्येकडेस योजावी ही आह्मा सर्वांची मानकरी गृहस्थांस प्रार्थना आहे.

६. वार्षीक हिशेबाच्या शिलकीप्रमाणें दरमहा ४०, ३०, किंवा २५ रुपये मुलांच्या विद्येकरतां द्यावे अशी आपणाकडून ज्ञातिफंडाचे ट्रस्टी यांस सूचना झाली असतां कोण-

तीं मुलें आश्रयास पात्र आहेत व त्यांस कोठपर्यंत आश्रय मिळावा याची निवड करण्यास ज्ञातींतील कांहीं सभ्य व शिकलेल्या लोकांची एक व्यवस्थापक मंडळी नेमली जाईल व ह्या मंडळीच्या शिफारसीवरून मुलांच्या विद्येकरितां मासीक जी एक रकम आपण लावून द्याल, तिची वहिवाट ट्रस्टी लोक करतील; व त्या खर्चाचा हिशेब तेच ठेवतील, आणि वर्षाअंती मुलांच्या विद्याभ्यासाचा रपोट आपणास सदरहू व्यवस्थापक मंडळी करील.

७. ह्या प्रसंगीं नागदेवी सरकारी मराठी शाळेचे मुख्य शिक्षक रा. रा. बाळयज्ञेश्वर पाध्ये ह्यांजविषयीं आपल्यास कांहीं तरी न सुचविलें तर आमच्या पदरीं कृतघ्नतेचा दोष येईल. आज ही शाळा स्थापन होऊन सुमारें ११ वर्षें झालीं. इतक्या वेळांत आपल्या ज्ञातींतील बहुतेक मुलांचा मराठींत अभ्यास बराच जाहाला. शिकविण्यांत अश्रान्त श्रम हा अलौकीक गुण जर ह्या शिक्षकांत नसता तर मुलांस जें मराठी भाषेचें व शाळेंतील विषयांचें ज्ञान झालें आहे त्याचे $\frac{1}{4}$ ही ज्ञान त्यांस मिळतें ना; व ज्या अर्थीं आपल्याच ज्ञातींतील पुष्कळ मुलें ह्या शाळेंत शिकलीं, व हल्लीं शिकत आहेत त्या अर्थीं ज्ञातीस हें योग्य आहे कीं तिणें शक्त्यनुसार शिक्षकास आपली कृतज्ञता प्रदर्शीत करावी. ह्याजकरतां आह्मां सर्वांच्या मनासारखी आपल्याकडून फंडांतून मदत मिळाल्यास व्यवस्थापक मंडळी ह्या शिक्षकाच्या श्रमाचा विचार करील; व आह्मी अशी आशा बाळगतों कीं व्यवस्थापक मंडळीचे सर्व ठराव आपल्यास मंजूर होतील.

८. ह्या अर्जाकडेस आपलें लवकर लक्ष पोहंचविल्यानें, मानकरी गृहस्थहो, आह्मांवर व ज्ञातींतील सर्व आबालवृद्धांवर आपले अनंत उपकार होतील, व अनाथ विद्यार्थी मुलें ईश्वराजवळ आपणास चिरकाल ऐश्वर्य व आयुष्य मागतील.

मुंबई, तारीख ३ माहे मे सन १८७४. आपले आज्ञांकित सेवक,

ह्या अर्जावर सभेंत हजर असलेल्या सर्वांच्या सह्या झाल्या आहेत. ह्या प्रसंगीं रा. नारायण फकीरजी ढगे यांची अध्यक्षस्थानीं योजना झाली होती, ह्मणून सभेच्या तर्फे तो अर्ज त्यांनींच मानकऱ्यांकडे त्याच महिन्याच्या (सन १८७४ मे) १२ व्या तारखेस रवाना केला. त्याचें जून अखेर पर्यंत कांहींच उत्तर आलें नाहीं ह्मणून ता. २८ जून रोजीं अध्यक्ष नारायणराव यांनीं मानकऱ्यांस एक पत्र लिहिलें तें येणेंप्रमाणें:—

॥ श्री ॥

**राजमान्य राजश्री कृष्णाजी मुकुंद शेट भोजने, बापुजी नारायणजी शेट मेंगळे, मोरोबा बाळाजी शेट गुजर, व नानाभाई विश्वनाथ शेट सदावर्ते, कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळींतील मानकरी गृहस्थ यांस.**

महाराज,

माहे मे तारीख ३ रोजीं नागदेवी सरकारी मराठी शाळेंत आपल्या ज्ञातींतील लोकांची सभा भरली होती, तेवेळीं ज्ञातींतील अनाथ विद्यार्थी मुलांच्या साह्यास ज्ञातिफंडांतून कांहीं मदत मिळावी ह्मणून आपणा मानकऱ्यांस जो अर्ज करण्यांत आला तो आपणाकडेस

त्याच महिन्याच्या १२ वे तारखेस रवाना झाला. परंतु आह्मी अत्यंत दिलगीर आहों कीं आपण त्या अर्जाकडेस अजून लक्ष पोंचविलें नाहीं. आह्मी ऐकतो कीं तो अर्ज अजून मानकरी रा. बाळकृष्ण मुकुंद शेट भोजने यांजकडेस लखोट्यासहित तसाच पडला आहे. ही गोष्ट जर खरी असली तर अनाथ विद्यार्थी मुलांचें दुर्दैवच ओढवलें आहे असें समजलें पाहिजे.

महाराज, हें सार्वजनिक काम आहे; व असल्याच कामांची व्यवस्था पाहण्याकरितां मानकऱ्यांचें अगत्य असतें, हें आपणास सांगणें न लगे. ज्ञातींतील गरीब मुलांस विद्या संपादन करण्याकरितां द्रव्याची कितपत गरज आहे हें अर्जांत सविस्तर लिहिलें आहे, ह्मणून तो अर्ज वाचून पाहिला असतां आपली खात्री होईल. ह्या दुनयेंत मानकरी किंवा पुढारी लोकांनीं गैरसोय व श्रम सोसल्यावांचून सार्वजनिक कामें सिद्धीस जात नाहींत, ह्मणून आमची पूर्ण खात्री आहे कीं आपण आतां तरी त्या अर्जाचा इच्छीत निकाल कराल. अर्जा संबंधी कांहीं शंका असल्यास आह्मांस कळवावें ह्मणजे त्या विषयीं आह्मी आमचा अभिप्राय प्रदर्शित करूं. सदरील सभेच्या दिवशीं अध्यक्षस्थानीं आमची योजना झाली होती ह्मणून अर्जाचा इच्छित निकाल त्वरित करून घेण्याचें काम सर्वांशीं आह्माकडेसच आहे असें आह्मी समजतों.

मुंबई, ता. २८ माहे जून १८७४.

आपला नम्रतम सेवक,
(सही) **नारायण फकीरजी.**

---

ह्या पत्रा नंतर मध्यंतरीं नारायणराव व शिवशंकर मलोजी यांचा या अर्जा संबंधीं बराच पत्रव्यवहार झाला; तो स्नेहाच्या नात्यानें परस्परांत झालेला असल्यामुळें प्रसिद्ध करवत नाहीं. त्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं मानकरी लोक ज्ञातींतील अनाथ विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करितात ही दुःखाची गोष्ट होय. ह्या कामांत रा. भाऊ हरिश्चंद्रजी निरगुडे यांनीं पण पुष्कळ मेहनत केली, व त्यांच्या श्रमाविषयीं नारायणरावांनीं शिवशंकर मलोजी यास लिहिलेल्या एका इंग्रजी पत्रांत उल्लेख केला आहे.

ज्ञातीनें अर्जदारासारखें किंवा याचकासारखें मानकऱ्यांच्या घरीं रात्रंदिवस पाणी भरावें, परंतु ते अधिकाराच्या गुंगीनें मस्त झालेले, ज्ञातिबांधवांच्या कल्याणाकडे कशास लक्ष देतील? नारायणरावांनीं सभेचा अर्ज पाठविल्या दिवसापासून त्यांनीं व भाऊ हरिश्चंद्रजी, व शिवशंकर मलोजी यांनीं किती वेळ माजी मानकरी मोरोबा बाळाजी यांच्या भेटी घेतल्या, व त्यांस त्या अर्जा संबंधी पत्रें पाठाविलीं? शेवटीं मे महिन्याच्या १२ व्या तारखेस पाठविलेल्या अर्जाचें उत्तर मोठ्या प्रयासानें सप्तंबर महिन्यांत ह्मणजे चार महिन्यांनीं हातीं आलें. तें माजी मानकरी बापूजीनें लिहिलेलें असून त्यावर बाहुल्याप्रमाणें मोरोबा बाळाजी ह्यांनीं सही केली आहे. कृष्णा मुकुंद शेट यांनीं तर भीत भीत आपल्या नांवाचीं पहिलीं दोनच अक्षरें घातलीं आहेत, व तीं देखील मोरोबा बाळाजी प्रमाणें बापू शेटच्या

सहीपासून चार बोटाच्या अंतरावर लिहिलीं आहेत. आहाहा, किती निस्पृहता, व मनाचें स्वातंत्र्य हें!! या पत्रावरून तें लिहिणाराचें सौजन्य किती आहे हेंही उघड दिसतें.

---

॥ श्री ॥

**रा० रा० नारायण फकीरजी शेट वगैरे यांसि,**

लिहावयास कारण कीं, आपल्या ज्ञातींतील गरीब व निराश्रित विद्यार्थी मुलांस फंडांतून मदत मिळावी या हेतुनें जो अर्ज ता. ३ माहे मे सन १८७४ चा व दुसरें पत्र ता. २८ जूनचें पाठविलें तें आह्मांस पोंहचलें, लिहिलेला मजकूर समजला.

सांप्रत फंडाची व्यवस्था पाहातां सदरील अर्जाचा विचार करणें योग्य दिसत नाहीं त्यास सर्व सभा कारणपरत्वें होईल तेव्हेळीं पाहातां येईल.

(सही) BAPOOJEE NARAYEN SETT.

ता. २ सप्तेंबर सन १८७४.

( „ ) MOROBA BALLAJEE.
( „ ) C. M.

---

हा विषय ह्या वृत्तांतांत लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, ज्ञातीच्या झालेल्या सभांपैकीं दोन सभेंत जातीविषयींच्या निष्काळजीवर बरीच चर्चा झाली होती, व ज्ञातीच्या सार्वजनिक कामांत आपणास मानकरी ह्मणविणारे किती बेपर्वाईनें वागतात हें ज्ञातींतील आबालवृद्धांस पूर्णपणें समजलें पाहिजे.

माजी मानकऱ्यांचा दुसऱ्या एका गोष्टीविषयीं मोठाच कटाक्ष आहे; तो हा कीं, त्यांच्या हुकूमावांचून ज्ञातीच्या सभा कोणीही भरूं नयेत. काय ही सत्ता व अभिमान!! ह्या एकूणीसाव्या शतकांत, व इंग्रजी राज्यांत ज्यांच्यावर आपली फिर्याद त्यांनींच आपले न्यायाधीश व्हावें काय? ज्ञातीच्या पंचायतींत, ह्मणजे पूर्वी ज्ञातीच्या सभेंत, रघुनाथ शहाणे, गंगाधर शेटजीची नात इत्यादि यांच्या खासगी ऐवजा संबंधीं किती कागाळ्या आल्या होत्या, व तेव्हेळीं आपणास मानकरी ह्मणविणारे यांनीं आपली न्यायनिष्ठा कितपत दाखविली! ज्ञातींत पूर्वी जो अंधार व जुलूम चालला होता, तो सर्व काढून टाकून व्यवस्था लावावी व कल्पित दाव्यापासून फंडाचें रक्षण करावें या हेतूनें ज्ञातींतील आबालवृद्धांनीं पंचमंडळी नेमिली ह्मणून ती मंडळी प्रतिपक्षास शत्रुवत् दिसत आहे. पूर्वी ज्ञातीच्या सभेंत निस्पृहतेनें भाषण करण्यास कोणास धैर्य होत होतें काय? व कोणी धैर्य केल्यास त्यास कोणत्या रीतीनें दटावीत असत हे सर्व मोरोबा बाळाजी विसरले काय? आपणास ऐश्वर्य अनुकूळ असतां ज्ञातिफंडास एक रूपयाही न देतां, प्रतिकूळ वेळीं मोठ्या डौलानें वीस हजार रूपये ज्ञातीस देवूं असें कबूल करणें ह्या सारखा स्वज्ञातीचा दुसरा छळ तर कोणता! ज्ञातींत सर्व लोक समंजस व निस्पृह असते तर ह्या छळाबद्दल छळ करणारास काय पारि-

पद्य झालें असतें? अशाप्रकारचा मानकरी ज्ञातीस ओझें होय, व त्याचा कित्ता घेणारे, व त्यास तसल्या कामांत मदत करणारे दुसरे मानकरी हेही ज्ञातीस उपद्रवकारक होत हें कोणीही सांगेल. आपला धर्म काय, आपलें कर्तव्य कोणतें, आपणास ज्ञातीनें मानकरी कां कबूल केलें, व आपणास ती मानपान कां देते; ह्या सर्व गोष्टींचा विचार करणें एकीकडेस ठेवून, स्वतःस सूज्ञ, मानकरी, पुढारी, अध्यक्ष, इत्यादि ह्मणावें, व ज्ञातीस, व विशेषेंकरून अनाथांस उपयोगी पडणारा जो फंड, त्यावर न्यायाच्या व नीतीच्या विरुद्ध घाला आणून, पुनः "आह्मी वंशपरंपरेनें मानकरीच" ह्मणत असावें, व त्याकरितां आपल्या जिवाची कहाली करून भांडावें यासारखें दुसरें खूळ कोणाच्याही पहाण्यांत व ऐकिवांत नाहीं. आपण आपलें कार्य साधण्याकरितां अंधारास उजेड ह्मणावें, परंतु एकाद्या निस्पृह स्पष्टवक्त्यास तें सहन न होऊन तो निर्भयतेनें प्रकाशास प्रकाश ह्मणूं लागला तर त्यावर कटाक्ष धरून भर सभेंत त्यास अपशब्द बोलावे, व आपल्यास अनुकूळ असणारे अशांपैकीं एकाद्या वेड्या मनुष्यास त्या स्पष्टवक्त्याची कणिक बडविण्याकरितां वामनेत्रानें इशारत करावी; व इतक्यानेंही समाधान होत नाहीं ह्मणून सभेच्या निमित्तानें आपलेच पांचसात मित्र एकत्र करून त्या स्पष्टवक्त्यास ज्ञातीच्या सभेंत येण्याची परवानगी नाहीं यावद्दल ज्ञातींत मनुष्य फिरवावा हा किती जुलूम, व किती अन्याय!! हा प्रकार कोणाच्यानें सोसवेल काय? असल्या जुलमी मानकऱ्यास यथेच्छ वागूं दिलें तर ज्ञातीवर व फंडावर किती अनर्थ गुदरतील ह्याची कल्पनाच केली पाहिजे. ह्या सर्व गोष्टींचा विचार करून, आपल्या ज्ञातीचा जीर्णोद्धार करणारे असे शुभकालीं निर्मित झालेल्या समापत्रांत मानकऱ्यांच्या असल्या दुर्निवार वृत्तीस आकलन करण्याकरितां पंचमंडळीची नेमणूक केली आहे. ह्या मंडळीच्या विचारानें ज्ञातिसंबंधी सर्व गोष्टींचा निकाल झाला पाहिजे. ह्या मंडळीचे सभासद निरनिराळ्या कुटुंबांतील निरनिराळे समंजस, असे सत्य व न्यायनिष्ठेनें वागणारे गृहस्थ आहेत. पंचमंडळीचे सभासद होण्यास समापत्रास अनुसरून प्रतिपक्षासही मोकळीक आहे. परंतु आपल्या हेतूस बाधक जें समापत्र व जी पंचमंडळी यांचा नाश व मोड हाच प्रतिपक्षाचा संकल्प असल्यावरून त्यांस सुबुद्धी ती कोठून होणार!

मध्यंतरीं बराच कागदशाईचा खर्च करून आपल्यास जसें काय देवानें किंवा सरकारानेंच अधिकार दिला आहे असें समजून पांडुरंगजी ट्रस्टींस बापूजी नारायण व मोरोबा बाळाजी यांनीं पत्रें पाठविलीं, त्यांत अधिकाराची मस्ती यावांचून दुसरें कांहीं दिसत नाहीं.

आमचे माजी मानकरी मोरोबा बाळाजी यांनीं या समयीं मोठी बहादुरी मिळविली. ती कोणती ह्मणाल तर रा. नानाभाई विश्वनाथ शेट सदावर्त (मोरोबांचे भाचे) यांजकरवीं एका आपल्या विशाल बुद्धीच्या मित्राच्या मसलतीनें समापत्रांतून आपली सही रद्द करविण्याबद्दल पत्र पाठविलें. सदावर्त हे अर्भक, ह्मणून एकट्याच्यानें त्या पत्रावर सही करण्यास धैर्य होईना ह्मणून पंचमंडळीच्या एका वयस्क, पण अनभिषिक्त सभासदास "रावजी" करून त्याजकरवीं सही करवून सन १८७७ आक्टोबर तारीख २७ रोजीं हें पुढील पत्र पंचमंडळीस पाठविलें.

To                                                                 *Bombay,, 27th October* 1877.

MR. SHEWSHUNKER MULLOJEE,

Secretary to the K. N. S. Community

Bombay.

DEAR SIR,

We request you will be so good as to have our signatures on the "Samapatra" cancelled from this date, as the consequences of the same being calculated to prove very detrimental to our interest.

Your's Sincerely,

(Signed) NANABHOY WISHVANATH SADAWART.

" NARAYEN RUGGHOONATHJEE DHAGAE.

( भाषांतर )

मुंबई, आक्टोबर, तारीख २७, १८७७.

रा. शिवशंकर मलोजी,

मुंबई कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळीचे चिटणीस यांस.

प्रिय महाराज,

आपणास आमची विनंती आहे कीं आपण कृपाकरून आजतारखेपासून समापत्रांतील आमच्या सह्या रद्द कराव्या; कारण त्या तशाच राहिल्यानें त्याचा परिणाम आमच्या हितास फार नाशकारक होण्याजोगा आहे.

आपले विश्वासु

( सही ) नानाभाई विश्वनाथ सदावर्त.

( ,, ) नारायण रघुनाथजी ढगे.

कदाचित् खासगी हितास अपाय होईल ही भीति सदावर्त यांचें वरील पत्र पाठविण्यास कारण होय हें त्या पत्रावरून स्पष्ट दिसतें. सदावर्त यांस मराठी व इंग्रजी वाचतां, लिहितां व बोलतांही येतें; व पंचमंडळीस अभिषिक्त करण्याच्या प्रसंगीं सन १८७७ सप्तंबर तारीख १६ रविवारीं झालेल्या अपूर्व समारंभांत यांनीं जें भाषण केलें, व जें भाषण पंचमंडळीच्या छापलेल्या वृत्तांतांत समग्र प्रसिद्ध केलें आहे त्यावरून तर भाषण करणाराची योग्यता सामान्य दिसत नाहीं. निस्पृहता, परोपकार बुद्धी, विद्वत्ता, अंतःकरणापासून ज्ञातीचा कळवळा, इत्यादि गुण तें भाषण करणाराच्या अंगीं असावेत असा तें भाषण वाचणारांस साहजिक ग्रह होतो. अशा पुरुषांनीं देवद्वारीं, ब्रह्मवृंदांनें आशिर्वादित, व मंगलवाद्याच्या गजरांत, व एक स्थलीं जमलेल्या ज्ञातींतील आबालवृद्धांच्या अपूर्व समुदायांत आपणास ज्ञातीचा मानकरी व अधिकारी ह्मणवून व करवून घेतला त्या सारखा भाग्यवान् पुरुष दुसरा आपल्या ज्ञातींत कोण आहे बरें ? नानाभाई यांचे प्रपिता आत्माराम बाळाजी शेट यांनीं स्वकष्टानें असंख्य द्रव्य संपादिलें, व देवब्राह्मणांस संतुष्ट करून आपल्या सत्यनिष्ठेनें व दानधर्मानें अनेक प्रदेशांत आपली कीर्ति अजरामर करून ठेविली. परंतु त्यांस, आपल्या नातवंडास वर दर्शविलेला जो सन्मान मिळाला, त्याचा एक शतांशही लाभला नाहीं. समस्तांची आपल्या हातून सेवा घडावी ह्मणून आपण मानकरी व्हावें हें आत्माराम शेटीस इष्ट वाटल्यावरून मानकऱ्याचें पद व अधिकार ज्ञातीकडून मिळवून घेण्याकरितां शेटीस लहानसहान श्रम पडले नाहींत. बहुत वर्षें ज्ञातीनें त्यांस कसोटीस लावून त्यांच्या धार्मिक व परोपकार बुद्धि व कृतीविषयीं खात्री करून घेतल्यानंतर ज्ञातीनें त्यांस गार्हस्थाभिषेक के-

ला. परंतु प्रकृत व्यक्ती नानाभाई विश्वनाथ सदावर्ते यांस अनायासें, व खर्चावांचून असा हा अलभ्य व अकल्पित लाभ झाला ह्मणून त्यास आम्ही वर भाग्यवान ह्मटलें. याप्रसंगीं नानाभाई यांनीं केलेलें भाषण मागल्या ज्ञातिसभेच्या वृत्तांतांत प्रसिद्ध झालें आहे तरी तें या ठिकाणीं सविस्तर दाखल केल्यावांचून आमच्यानें रहावत नाहीं. मग वाचक तें त्यांचे स्वतःचे भाषण समजोत अगर त्याकरितां त्यास तें दुसऱ्यानीं लिहून दिलेलें समजोत.

ज्ञातिबंधुहो,

आजचा हा सुदीन पाहून माझ्या चित्तास फार आनंद होतो. आपण समस्तांहीं जो मला मान दिला व देत आलांत तेणेंकरून मी तुमचा ऋणी आहें; व तो मान दिवसेंदिवस वाढविण्यास म्यां यत्न करावा हा माझा धर्म आहे; आणि असें म्यां केलें असतां माझ्या हातून ज्ञातीची सेवा घडण्याचा माझा जो मुख्य उद्देश तो बहुतांशीं सिद्धीस जाणारा आहे. समुदायाची सेवा घडणें हें जो सुदैवी त्याच्याच हातून होतें. धन, विद्या, सत्ता, शक्ति हीं जरी दैववान पुरुषांसच प्राप्त होतात तथापि समुदायाची सेवा ज्या पुरुषाकडून घडते त्यासच खरा दैववान ह्मटलें पाहिजे. हा माझा मनोरथ जगदीश पूर्ण करील काय? आजपर्यंत ज्ञातींतील अव्यवस्था पाहून माझ्या मनास अति क्लेश होत होते; परंतु ज्ञातीच्या सुदैवानें जगदीश्वरास दया येऊन तो आपल्यावर कृपादृष्टीनें अवलोकन करीत आहे. सर्व अंधार दूर होऊन ज्ञानरूप जो सूर्य तो सत्यारूढ होऊन आज उगवला आहे, तो या पंच मंडळीच्याच आश्रयानें उगवला आहे. शुद्ध परोपकार बुद्धीनें हें कार्य ह्या पंच मंडळीनें इतक्या पल्ल्यास आणलें ह्यांत काडीमात्र संशय नाहीं; परंतु ज्यांस वयोवृद्ध व पोक्त समजून ज्ञात ज्यावर आजपर्यंत अवलंबून होती त्यांकडून ज्ञातीचें बिलकूल कल्याण न व्हावें, व उलट त्यांनीं खोट्या अभिमानांत गर्क होऊन ज्ञातीच्या कल्याणार्थ जे जे ह्या पंचमंडळीनें प्रयत्न केले किंवा करीत आहे त्यांस विघ्नें आणावीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. खोटा अभिमान सत्य व न्याय ह्यांपुढें बिलकूल टिकत नसतो, हें आपण जाणतच आहां. सतकृत्याचा अभिमान बाळगणें ह्यांतच पुरुषार्थ आहे. असो; तथापि ह्या पंचमंडळीचा सतकर्मीं दृढ निश्चय पाहून मला फार आनंद होतो, व माझी पूर्ण खात्री आहे कीं, जर ज्ञातीची सुधारणा होणें असली तर ती ह्या मंडळीच्याच हातून होईल. असल्या ह्या सत्यास अनुसरून चालणारे मंडळीस कोणी बरें उत्तेजन देऊं नये? सर्वांहीं द्यावें. आबालवृद्धहो! ज्या पंच मंडळीस आपण फंड सुरक्षित राखून ज्ञातींत व्यवस्था राखण्याकरितां ह्या समापत्रानें अखत्यार दिला आहे त्या पंचमंडळीवर तुमचा पूर्ण विश्वास असूं द्या. त्या मंडळींत जसे तरुण गृहस्थ आहेत, तसे वयानें प्रौढही आहेत; व आपल्या ज्ञातींत जे कोणी सुशिक्षित, बुद्धिमान, सत्यवादी, व निस्पृह आहेत ते बहुत्येक ह्या मंडळींत आहेत ह्यांत काडीमात्र संदेह नाहीं. तेव्हां अशा पंचमंडळीवर तुह्मी विश्वास ठेवणार नाहीं तर कोणावर ठेवणार बरें? ह्या पंच मंडळीवर विश्वास ठेविल्यानें तुमचें दिवसेंदिवस कल्याण होऊन बेबंदरूप जो अंधःकार हल्लीं आपल्या ज्ञातींत आहे तो बिलकूल नाहींसा होऊन व्यवस्थारूप सूर्य प्रकट होईल, व ज्ञातींतील गोरगरीबांचे मनोरथ पूर्ण होतील. ह्या मंडळीनें बुद्धि, बळ, श्रम व द्रव्य इत्यादि खर्च करून ज्ञातीच्या व्यवस्थेचें पुनरुज्जीवन करण्याचें कां बरें केलें? त्यांस फंडांतून कांहीं इनाम मिळणार आहे काय? किंवा तुह्मी ज्ञातिबांधव वर्गणी करून कृतज्ञबुद्धीनें त्यांच्या उपकाराची फेड करणार आहां काय? तुह्मी द्रव्य खर्चून त्यांच्या उपकाराची फेड करावी अशी ते बिलकूल इच्छा करीत नाहींत. तरी दुसऱ्या रीतीनें तुह्मी त्यांचे उपकार फेडावे हें तुह्मांस योग्य आहे. ती रीत कोणती ह्मणाल तर ज्ञातीच्या व्यवस्थेकारतां जीं जीं कामें ती मंडळी करील तीं तीं तुह्मांस मान्य व्हावीं, व मान्य होतील ह्याविषयीं तुह्मी समापत्रावर सह्या केल्यानें कबूल केलेंच आहे. ह्या पंच मंडळीनें जे नियम केले आहेत व जे आपल्या योग्य चिटणीसांनीं आताच वाचून दाखविले त्याप्रमाणें तुह्मी वागाल तरच ज्ञातींत संप राहून तिच्या नाशास प्रवृत्त झालेल्या लोकांचे यत्न निष्फल होतील. एखादा नियम तुह्मांस अवघड वाटत असला तरी तो अवघड समजूं नका; कोणती तरी अडचण किंवा गैरसोय काढल्यावांचून सुख मिळत नाहीं, किंवा इच्छित कार्य सिद्धीस जात नाहीं. हा सर्व विचार करून पंच मंडळीनें मोठ्या श्रमानें हे नियम आपणाकरितां तयार केले आहेत त्याप्रमाणें शब्दशः आपण सर्वांनीं वागलें पाहिजे. ह्यांतच आपलें खरें हित आहे. प्रतिकूळ लोकांच्या उंची पोषाखास व मधुर शब्दांस भुलूं नका. त्यांनीं एकही लोकहिताचें काम केलें नाहीं, व त्यांच्यानें होणारही नाहीं. स्वार्थबुद्धीनें सुजनांच्या प्रयत्नांस अरिष्टें आणणें हाच त्यांचा उद्योग आहे, व अशाप्रकारचेच प्रयत्न ते आजदीनपर्यंत करीत आले, व त्यांचें फळ त्यांस प्राप्त होईल. समापत्र व नुसते नियमच करून आपण कृतार्थ झालों असें समजूं नका. तुह्मी सर्व ह्या पंच मंडळीवर पूर्ण विश्वास ठेवून ह्या नियमाप्रमाणें वागाल

व त्या मंडळीस वारंवार उत्तेजन देत जाल, तर आपल्या लोकांचा धंदारोजगार, ज्ञातींतील मुलांची विद्या इत्या
वाढविण्याचे प्रयत्न व दुसऱ्या उपयुक्त गोष्टी प्रवृत्तींत आणण्याचे यत्न ह्या मंडळीकडून होतील. शेवटीं, आपण जे
मला टिळ्या विड्यांचा अधिकार व मान दिलात, व देत आलात, ह्याकरितां मी आपले उपकार मानितों. मान
कऱ्याचें काम उत्तम प्रकारें चालविण्यास परम दयाळू परमेश्वरानें मला शक्ति द्यावी हींच माझी त्याजवळ मनः-
पूर्वक प्रार्थना आहे.

अहाहा! किती सत्यनिष्ठा, न्यायनिष्ठा, बुद्धीविभव, ज्ञातीची कळवळ, मनाचें थोरपण,
स्वभावाचा गंभीरपणा, परोपकाराची इच्छा, विचाराचें स्वातंत्र्य, व निस्पृहता ह्या भाषणांत
स्पष्ट होतात. इतकें असून या सुभाषितास मृगजलाची उपमा देऊं लागलों तर आमच्या
परपेंठवासी ज्ञातिबंधूंच्या पोटांत धस्स झाल्यावांचून रहाणार नाहीं. आजोबानंतर तीर्थरूपानें
मानकऱ्याची मानमरातब भोगिली, तेव्हां चिरंजीवासही मानमरतबा मिळाली पाहिजे;
तशांत पंचमंडळीनें ज्ञात सुधारणेचा क्रम सुरू करण्यापूर्वींपासून नानाभाई त्या मंडळीच्या
उद्देशास धरून राहिले होते; परंतु कसोटीस लागण्याची जेव्हां वेळ आली, तेव्हां सुवर्णा-
चा जो भास होता तें पितळ ठरलें. नानाभाई यांनीं पंचमंडळीच्या बहुतेक सभासदांस
ह्मणून दाखविलें आहे कीं माझ्या तीर्थरूपाचें मृत्युपत्र चालविणारे यांच्या दुःखामुळें मला
माझा पंचमंडळी बरोबर दिसता संबंध तोडावा लागेल. तेवेळीं पंचमंडळीच्या कित्येक सभा-
सदांनीं त्यांस धीर देवून अश्वासन दिलें कीं आपणावर किती जरी कठिण प्रसंग आला
तरी आपण पंचमंडळीच्या स्तुत्य कामापासून जर निवृत्त न व्हाल तर आम्ही त्या अडच-
णींतून पार पडण्यास तुह्मास साह्य होऊं. परंतु पितळाबाईनें दोन दिवस सोनाबाईचा
डौल घातला ह्मणून पितळेस जन सोनु ह्मणेल काय? नानाभाई हे सही रद्द करण्याविषयीं
पत्र पाठवून स्तब्ध राहिले नाहींत. तर, तदनंतर आपण देवमंदिरांत आबालवृद्धांसमक्ष सा-
क्षात् श्रीमत्भगवद्गीता हातांत घेऊन कोणती प्रतिज्ञा केली व आपल्या गळ्यांत पुष्पांच्या
माळा घालून, ध्वज उभारून, नाग देवळाच्या आसमंतांतील भागांत जयघोष करीत आ-
पली स्वारी कां काढिली हें सर्व विसरून, व आपण त्या प्रतिज्ञेचें उल्लंघन केलें असतां
जन आपल्यास काय ह्मणेल, व त्याचा काय परिणाम होईल, हा सर्व विचार सोडून ना-
नाभाई यांनीं पंचमंडळीचा मोड करण्याच्या हेतूनें प्रतिपक्षास सामिल होऊन त्या कामाक-
डेस हल्लीं आपलें तन, मन, व धन अर्पण केलें आहे.

सन १८७७ आक्टोबर ता. २७ रोजीं ट्रस्टी जयरामजी अंतोबा दिघे यांनीं दिपवाळी
निमित्य गरीबांस दाणा इत्यादि फंडांतून वांटण्याबद्दलची उभय ट्रस्टींस पंचमंडळीनें पाठ-
विलेल्या चिठ्ठीचा जबाब पाठविला. तो मोठ्या उर्मटपणाणें लिहिलेला आहे.

सन १८७७ नवंबर ता. १३ रोजीं पंचमंडळीनें उभय ट्रस्टींस एक पत्र पाठविलें
त्याचें तात्पर्य इतकेंच कीं नवंबर ता. १२ रोजीं भरलेल्या पंचमंडळीच्या सभेंत ६६ व
६७ व्या नियमांस अनुसरून झालेल्या ठरावाप्रमाणें आपण ज्ञातिफंडांतून दरमहा दोन
रुपये सदाशिव धुरू यांची अनाथ विधवा ठकुबाई हीस देत जावें.

नंतर सन १८७८ जानेवारी ता. १६ रोजीं जयरामजी ट्रस्टी यांनीं पांडुरंगजी ट्रस्टी-
स एक पत्र पाठविलें व त्या पत्राबरोबर प्रतिपक्षांतील मुख्यांनीं केलेला ठराव पाठविला.

या ठरावाचें तात्पर्य इतकेंच आहे कीं ट्रस्टींच्या पेटींतील सर्व कागदपत्राची व ऐवजाची टीप करण्याकरितां अमुक दिवशीं प्रतिपक्षाच्या मंडळींतील सहा असामी येतील, तेव्हां त्यांस पांडुरंगजीनें पेटी उघडून दाखवावी. हा पोरकट ठराव पांडुरंगजीनें पोरकटच समजून निकाम्या कागदांत टाकून दिला. या सहा असामींत रा. वासुदेव बाळाजी मुरांजण यांचें नांव लिहिलें आहे. वासुदेवजीस ही गोष्ट माहित नसल्यावरून त्यांस कळविल्यावांचून त्यांचें नांव लिहिलें ह्मणून त्यांस फार वाईट वाटलें, व त्याकरितां त्यांनीं असें करणारांस ठपकाही दिला.

६४ व्या नियमाप्रमाणें सन १८७८ सालांत २, सन १८७९ सालांत २, व सन १८८० त २, अशीं साहा वनभोजनें झालीं. १८७८ रांतील पौष्य वनभोजन रविवार ता. २० जानेवारी रोजीं व चैत्रांतील ता. १९ एप्रिल शुक्रवार रोजीं; तसेंच १८७९ तील पहिलें ता. १२ जानेवारी रविवार रोजीं, व दुसरें ता. ११ एप्रिल शुक्रवार रोजीं; १८८० तील पौष वनभोजन तारीख २९ जानुआरी रविवार रोजीं, व चैत्रांतील वनभोजन तारीख २९ एप्रिल रविवार रोजीं.

या वनभोजनाकरितां प्रशस्त वाडी असावी ह्मणून क्षत्रिय ज्ञातींतिल रा. रा. जनार्दन रामचंद्रजी यांनीं आपली ग्रामदेवीजवळची वाडी दिली होती ह्मणून त्यांस त्याकरितां १८७९ मे ता. ७ रोजीं पंचमंडळीनें आभारदर्शक पत्र पाठविलें.

## प्रतिपक्षाचा समापत्रावरील शेरा.

ज्ञातींत सर्वांचें ऐक्य व्हावें ह्मणून मध्यंतरीं रा. वासुदेव बाळाजी मुरांजण, वेदशास्त्र संपन्न बाळ यज्ञेश्वर शास्त्री, रा. बाळकृष्ण हरिश्चंद्रजी भोजने, रा. काशिनाथ बाळाजी मुरांजण, व रा. बाळकृष्ण रामचंद्र बरवे यांनीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु समापत्र रद्द करणें हाच प्रतिपक्षाचा संकल्प असल्यावरून, त्यांचे प्रयत्न निष्फल झाले. प्रतिज्ञेविषयीं समापत्रांतील दहावें कलम जर रद्द कराल व आमचा पूर्वींचा मानपान व अधिकार जर राहील तर आह्मी ऐक्य करण्यास अडथळे करणार नाहींत, व अशा प्रकारचा आह्मी आमचे हातीं शाईनें समापत्रावर शेरा लिहूं, व जो शेरा आह्मीं लिहूं तो तुह्मांस कबूल केला पाहिजे इत्यादि अटी दाखवून प्रतिपक्षांतील प्रमुखांनीं शेऱ्याचा खरडा पंचमंडळीच्या पसंतीस पाठविला. हा शेरा नाना फडणविसाची कारकुनी खर्चून तयार केला होता. परंतु हा पहिला खरडा समापत्रास फारच बाधक असल्यामुळें पंचमंडळीनें नापसंत केला. नंतर त्या लोकांनीं दुसरा खरडा पाठविला, तो नक्की करण्याकरितां रा. बाळकृष्ण हरिश्चंद्रजी भोजने यांच्या येथें प्रतिपक्षांतील प्रमुख व पंचमंडळींचे कांहीं सभासद जमले होते. तेथें त्या खरड्यांत फेरफार होऊन तो उभयपक्षांनीं कबूल केला; परंतु प्रतिपक्षांतील कित्येक अकटोविकट विद्वानांनीं तो शेरा नापसंत केल्यावरून कांहीं दिवस ही गोष्ट तशीच राहिली.

सन १८७८ फेब्रुवारी महिन्यांत रा. मोरोबा बाळाजी यांच्या येथें त्यांच्या मुलीचें लग्न उद्भवल्यावरून व समेट करण्याची पंचमंडळीची आतुरता पाहून त्या वर्षांतील फेब्रुवारी

महिन्याच्या २७ व्या तारखेस ते रा. बाळकृष्ण रामचंद्र बर्वे यांच्या येथें समापत्रावर सही करण्याचा हेतू दर्शवून आले, व त्यांजबरोबर, किंवा थोड्या वेळानें त्यांच्या नंतर, रा. कृष्णा सखाराम दिघे हे पण प्रतिपक्षाच्या तर्फेनें आले. नंतर बाळकृष्णजी बर्वे यांच्या सूचनेवरून पंचमंडळीचे चिटणीस व कांहीं सभासद समापत्र घेऊन त्यांच्या येथें गेले. नंतर तेथें शेऱ्याविषयीं बरीच वाटाघाट होऊन वैय्याकरणी कृष्ण सखाराम दिघे यांनीं शेऱ्यांतील पंचमंडळीच्या तर्फे सुचित केलेल्या कांहीं शब्दांवर टीका केली. त्या टीकेचा योग्य निकाल झाल्यावर तेथें हजर असलेल्या पंचमंडळीच्या सभासदानीं प्रतिपक्षांनीं लिहून आणलेला शेरा जरी समापत्रास कांहीं अंशीं बाधक दिसला, तरी ज्ञातींत होणाऱ्या ऐक्यतेकडे लक्ष देऊन तो शेरा कबूल केला; व तो तेथेंच समापत्रावर लिहून त्यावर मोरोबा बाळाजी यांनीं सही केली व त्याजबरोबर कृष्णाजी दिघे यांनींही स्वेच्छेनें सही केली. तो शेरा येणेंप्रमाणें:—

१८७८ फेब्रुवारी २८—"ह्या समापत्रांतील दहावें कलम खेरीजकरून हें समापत्र व त्यांतील सर्व कलमें आह्मा सर्व सह्या करणारांस कबूल आहेत. आमचा मानपान व अधिकार पूर्वीप्रमाणें चालावा व आम्ही जें आमचें ज्ञातिसंबंधीं कर्तव्य तें धर्मन्यायानें व निष्पक्षपातानें करावें या हेतुनें आम्ही या समापत्रावर सह्या केल्या आहेत."

(Signed) MOROBA BALLAJEE GOOGER.

ह्या प्रसंगीं रा. वासुदेव बाळाजी मुरांजण व कांहीं इतर मंडळी हजर होती. मोरोबा बाळाजी यांनीं समापत्रावर शेऱ्या खालीं सही करण्यापूर्वीं वासुदेवजीनें त्यांस विचारिलें कीं हा शेरा तुमच्या मंडळीस कबूल आहेना, व आतां कांहीं वांधा राहिला नाहींना? तेव्हां मोरोबानीं सर्वांसमक्ष सांगितलें कीं हा शेरा आमच्या मंडळीनेंच तयार करून पसंत केला आहे व आतां कोणत्याही गोष्टीचा वांधा राहिला नाहीं; व बापूजी व आमची इतर मंडळी ह्या समापत्रावर आतां विन हरकत सह्या करतील. या समेटीमुळें सर्वांस आनंद झाला ह्मणून तेथें सर्वांही साखर घेतली. ह्या नंतर झालेला प्रकार सन १८७८ तील फाल्गुनोत्साहसंबंधी पंचमंडळीनें काढलेल्या प्रसिद्धीपत्रांत दिला आहे. त्या पत्रांतील अगत्याचा भाग मात्र येथें दाखल करितों.

"प्रतिकूळ पक्षानें आपलें पूर्वीप्रमाणें फंडावर स्वामित्व चालावें व केलेल्या समापत्राचा नाश करून पंचमंडळीचा मोड करावा ह्मणून भगिरथ प्रयत्न केले, पण देवदयेनें ते सर्व निर्फळ झाले. सर्वांचें ऐक्य होऊन ज्ञातींत सर्व सुरळीत चालावें याच शुद्ध हेतुनें पंचमंडळीनें प्रतिकूळ पक्षाचे जे हट्ट बिलकूल कबूल करूं नयेत ते देखील केले. सर्व ज्ञातींत एक संप व्हावा या हेतूनें रा. काशिनाथ बाळाजी मुरांजण, रा. वासुदेव बाळाजी मुरांजण, रा. बाळकृष्ण हरिश्चंद्रजी भोजने, व शेवटीं रा. बाळकृष्ण रामचंद्रजी बर्वे यांनीं पुष्कळ प्रयत्न करून माजी मानकरी रा. बापुजी नारायण मेंगळें, व रा. मोरोबा बाळाजी गुजर यांच्या, ज्ञातीस मिळून राहाण्याविषयीं, फार फार समजुती केल्या; परंतु ज्यांच्या मनांत कपट, व ज्यांची सार्वकाल स्वार्थावर दृष्टी, व जे आजपर्यंत ज्ञातीचा धिक्कारच करीत आलेले त्यांस दुसऱ्याच्या कल्याणाची गोष्ट कोठून रूचणार? समापत्रावर मुळींच शेरा करूं देऊं नये,

परंतु तें सुरक्षीत राहून जर एकी होत आहे तर शेरा करून देण्यांत अडचण नाहीं असा विचार करून पंचमंडळींनें प्रतिकूळ पक्षांतील प्रमुखांचा शेरा कबूल केला, व त्यास अनुसरून रा. मोरोबा बाळाजी गुजर यांनीं सही देखील केली. त्या समयीं रा. वासुदेव बाळाजी मुरांजण यांनीं मोरोबा बाळाजीस असें विचारलें कीं, हा शेरा तुह्मी तुमच्या (बापुजींच्या) मंडळीच्या विचारानें केला आहेना? व आतां कांहीं बांधा राहिला नाहींना? तेव्हां मोरोबांनीं कांहीं बांधा राहिला नाहीं असें बाळकृष्णजी बर्वे यांच्या येथें सर्वांसमक्ष सांगून, बापुजी, जयरामजी ट्रस्टी, व त्यांचे पक्षकार विन हरकत सह्या करतील असेंही सांगितलें; व ह्या समेटीमुळें सर्वांस आनंद झाला ह्मणून तेथें सर्वांहीं साखर घेतली. परंतु त्या शेऱ्यानें फंडावर आपला अधिकार पूर्वीप्रमाणें चालणार नाहीं, व तेणेंकरून आपला अर्थ साधणार नाहीं ही कल्पना मनांत आणून समापत्रावर सह्या करण्याचें, अनेक मिषांनें, बापुजींनीं आज उद्यांवर टाकिलें. शेवटीं गेल्या सोमवारीं सकाळीं बापुजींनें आह्मी आज सायंकाळीं रा. मोरोबा फकीरजी ढगे यांच्या घरीं येऊन सह्या करूं असें रा. बाळकृष्ण रामचंद्र बर्वे यांस वचन देऊन, आह्मी आज सायंकाळीं सह्या करितों या मिषानें रा. मोरोबा फकिरजी ढगे यांच्या येथें त्यांच्या नांवानें त्या दिवशीं सायंकाळीं ७॥ वाजतां पंचमंडळीच्या चिटणीसास समापत्र घेऊन यावें असें सांगून पाठविलें. परंतु मोरोबा बाळाजी, बापुजी नारायण, व जयरामजी ट्रष्टी यांनीं अनेक कुतर्क काढून असें सांगितलें कीं ज्या अर्थीं फंडावर आमचा अधिकार पंच मंडळीच्या अनुमत्तावांचून चालणार नाहीं त्या अर्थीं आह्मांस सह्या करणें रुचत नाहीं. तेवेळीं रा. बाळकृष्ण रामचंद्रजी बर्वे ह्यांनीं मोरोबा व बापुजीस आपल्या भाषणांत असें दाखविलें कीं फंडाचा नाश होत होता ह्मणून समस्त बाळगोपाळांनीं पंच मंडळीस फंडाचें संरक्षण करण्याकरितां अधिकार दिला आहे. व फंडांतून कांहीं खर्च करणें झाल्यास जें समापत्र तुह्मी कबूल करितां त्या समापत्रास अनुसरून तुह्मांस पंच मंडळीचा विचार घेतलाच पाहिजे. रा. वासुदेव बाळाजी मुरांजण यांनींहीं, हा सर्व अपराध तुमचाच आहे असें बापुजी व मोरोबास दर्शवून त्यांस निरुत्तर करून टाकिले.

"ह्यावरून आबालवृद्धहो, तुह्मी विचार करा कीं जो आपल्या सर्व ज्ञातीचा फंड त्यावर अधिकार नुसत्या मानकऱ्यांचाच कां असावा? व ते माजी मानकरी हेच बापुजी ना, कीं ज्यांनीं पहिल्यानें विडे गट्ट करून फंडावर माझें कर्ज घेणें आहे ह्मणून ३३ वर्षांनीं कल्पीत दावा उभारिला! व ते माजी मानकरी हेच मोरोबा नां कीं जे आपल्या मानकरीपणाच्या अभिमानांत गुंग होऊन बाळगोपाळांस विचारल्यावांचून बापुजीस फंडांतून १८०० रुपये देण्यास तयार झाले होते! व दुसऱ्याच्या बुद्धीनें चालणारे ते हेच जयरामजी ट्रस्टी ना कीं जे मोरोबाच्या सांगण्यावरून बापुजीस फंडांतून रुपये देण्यास तत्पर झाले होते!

"ह्या सर्व गोष्टींचा विचार करण्याकरितां गेल्या सोमवारीं सायंकाळीं ८ वाजतां पंच मंडळीनें रा. रामकृष्ण लक्षुमणजी डोळस यांच्या येथें ज्ञातींतील आबालवृद्धांची सभा भरविली होती, ते वेळीं असें ठरलें कीं बापुजी व मोरोबा यांच्या मनांतून फंडाचा नाश करावा व पूर्ववत ज्ञातींत अंदाधुंदी चालवावी असें आहे ह्मणून त्यांच्याशीं संप करण्याचा विचार

बिलकूल सोडून द्यावा, ह्या शिवाय आणखीं आतां इलाजच राहिला नाहीं; व आपण हातांत धरलेल्या सत्कृत्याचा अभिमान बाळगून जितक्यांनीं समापत्रावर सह्या केल्या आहेत त्या सर्वांनीं पंचमंडळीनें केलेल्या नियमांप्रमाणें, ज्या लोकांनीं सह्या केल्या नाहींत त्यांचेयेथें शुभाशुभास बिलकूल जाऊं नये; तसेंच बापुजी व त्यांचें मंडळ वारंवार जमून कांहीं कागद करून लोकांस भलभलतेंच सांगून फसवून सह्या घेतात ह्मणून त्यांच्या मंडळींत कोणी जाऊं नये. व त्यांच्या कागदावर कोणी सहीही करूं नये. तसेंच ज्ञातींतील सत्कृत्यांचा अभिमान बाळगणाऱ्या अवध्या बाळगोपाळांनीं नागदेवळांत बापुजी व त्यांचें मंडळ शिमग्याचा नाचरंग, घेरि, च्याहा, व धूळ करितील तेथें कोणी बिलकूल जाऊं नये. बाळगोपाळांचा धिक्कार करितात, व फंडाचा नाश करूं पाहतात अशा माजी मानकऱ्यांच्या नाचरंगास व घेरीस बाळगोपाळांनीं जाणें ह्मटलें ह्मणजे आपला स्वतःचा आपणच नाश करून घेण्यासारखें आहे; ह्यास्तव ही गोष्ट सर्वांनीं पक्केपणीं ध्यानांत बाळगून तेथें न जाण्याविषयीं दृढ निश्चय करावा."

फंडावर आपलाच अधिकार राहावा याविषयीं माजी मानकरी आपल्या जिवाची ओढाताण कां करितात बरें? त्यांच्या मानपानाविषयीं समापत्रांत कांहीं वांधा तर नाहीं; व जर ते मानकरी, बापूजींस त्यांच्या कल्पित दाव्यानिमित्य ज्ञातीस विचारल्यावांचून १,८०० रुपये देण्यास लगबग करतेना तर त्यांचा अधिकार पूर्वींप्रमाणें चालता कीं नाहीं? जर आमच्या रुसलेल्या माजी मानकऱ्यांच्या मनांतून फंडाचा नाश करणें नाहीं तर फंडांतून खर्च पंचमंडळीच्या संमतीनें करण्यास त्यांनीं कां अडचण घ्यावी? नियमांच्या सहाव्या प्रकरणाप्रमाणें मानकरी हे पंचमंडळींत देखील प्रमुखच; असें असून जर ते फंडावर अयोग्य अधिकार चालवूं पाहातात, तर त्यांस पदच्युत केलें ह्यांत ज्ञातीनें काय वावगें केलें? कार्यप्रयोजनीं नारळाचा मान, विड्याचा मान, व शिमग्यांत घेरीच्या वेळीं "छत्रपती" होण्याचा पोकळ, व मौर्ख्य प्रकट करणारा मान तर पंचमंडळी मागत नाहींना? नुसतें छत्राखालींच फिरण्याबद्दल, शृंगारित हत्तीवर छत्र चामर ठेवून व मागें पुढें नौबती व तुतारें वाजवीत जरी मानकऱ्यांनीं आपली वरात काढिली तरी पंचमंडळीस त्या गोष्टीची बिलकूल गरज नाहीं. कोणी न सांगतां मानकरी सभेत आपणच तक्याशीं येऊन बसले, तरी पंचमंडळी त्यांच्यापुढें आदरपूर्वक बसण्यास तयार आहे. पंचमंडळीस इतकें हें करण्याचा हेतू मानकऱ्यांच्या अंगीं कांहीं अलौकिक गुण आहेत, किंवा मिष्ट पदार्थाचे गुण, किंवा परिसाचे गुण आहेत असें नाहीं. तर फंडाचें संरक्षण व वृद्धी, व ज्ञातीची सुधारणा हीं त्यांच्याकडून करवावीं, अगर निदान ते व पंचमंडळी यांच्या अनुमतानें व्हावीं ह्मणून पंचमंडळीनें लहानपणा घेतला आहे. परंतु हत्तीचा मोठेपणा मुंगीच्या लहानपणास कशास जुमानील!

पंचमंडळीचा मागला वृत्तांत छापून प्रसिद्ध झाल्यापासून एकंदर सभा ३६ झाल्या. त्यांत पंचमंडळीच्या सभा २८ व आबालवृद्धांच्या सभा ८, पंचमंडळीच्या बहुतेक सभा रा. रा. शिवशंकर मलोजी चवाथे यांच्या येथें भरत असत, व आबालवृद्धांच्या सभा रा. रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस यांच्या सदरेंत भरत असत.

ता. १७ नवंबर १८७७ रोजीं झालेल्या पंचमंडळीच्या सभेंत रा. नारायण पुरुषोत्तम मेंगळे यांस पंचमंडळीचे सभासद करून, जानेवारी १८७८ ता. ६ रविवार रोजीं झालेल्या आबालवृद्धांच्या सभेंत समापत्रांतील १० व्या कलमाप्रमाणें त्यांस अभिषिक्त केलें.

सन १८७८ व १८७९ ह्या सालांतील फाल्गुनोत्साह ६९ व्या नियमाप्रमाणें नागदेवळाच्या सभामंडपांत होण्याबद्दल रा. रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस यांच्या सदरेंत झाला. नागदेवळांतील सभामंडपांत रंग न करण्याचें कारण तेथें पंचमंडळीस अभिषिक्त करण्याच्या प्रसंगीं प्रतिकूळ पक्षानीं मागें जसा दंगा केला होता त्याप्रमाणें कदाचित एकादा नारसिंह अवतार धारण करणारा मनुष्य प्रकट होऊन दंगा करील हें होय. ह्या रंगाच्या प्रसंगीं प्रतिपक्षांतील पांचपंचवीस मंडळी खेरीज करून आटोकाट सर्व आबालवृद्ध आले होते, व इतक्या समाजाचा एकाच वेळीं सदरेंत समावेश होणें कठीण पडलें ह्मणून स्वेच्छेनें बहुतेक मंडळी डोळस यांच्या ओटीवर व त्यांच्या समोरल्या घरांच्या ओटीवर बसली होती. ह्या प्रसंगींचा अपूर्व समुदाय पाहून सर्व लहानमोठयांच्या मुद्रा आनंदित दिसत होत्या. प्रतिपक्षाकडीलही कांहीं मंडळी हा बाळगोपाळांचा रंगसमाज पाहण्याकरितां आली होती; त्यांचें आदरआतिथ्य पंचमंडळीनें निर्द्वेष बुद्धीनें यथासांग केलें. पूर्वीपासून पंचमंडळीच्या बहुतेक सभासदांच्या मनांतून रंगाच्या दिवशीं नाच करण्याची, घेरी काढण्याची, व धुळवडीच्या दिवशीं फिरण्याची चाल बंद करण्याचें होतें, परंतु आबालवृद्धांस हा नवीन क्रम कदाचित् रुचणार नाहीं ह्मणून पहिल्या वर्षीं, ह्मणजे १८७८ रांतील शिमग्यांत नाच, घेरी, व धुलीवंदन पूर्वापार रीतिप्रमाणें जाहालीं. या प्रसंगींचा अफाट समुदाय पाहून प्रतिपक्षाची समुदायसंख्या बोटांवर मोजतां येईलशी दिसली; व जरी त्यांचा समुदाय चित्रविचित्र सोंगांनीं, व रंगांनीं, व कर्कश वाद्यांनीं, व छत्रांनीं, व त्यांच्या आश्रितांपैकीं कांहीं परकीय ज्ञातीचे लोक घेरीस बोलावून शोभविला होता तरी त्यांच्यापैकीं एकाचेंही मुख प्रफुल्लित दिसत नव्हतें. हिरमोड हा त्या सर्वांच्या तोंडावर स्पष्ट दिसत होता.

धुळवडीच्या दिवशीं ६९ व्या नियमाप्रमाणें सर्वांस काफी झाल्या नंतर धुलिवंदनास आलेल्या समुदायाची सभा रा. रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस यांच्या येथें भरली होती. ह्या सभेंत बहुतेकजणांनीं भाषणें केलीं; त्यांत रा. गोपिनाथ दादाजी सारंगधर यांचें भाषण सत्कर्मीं झटण्यास फारच उत्तेजन येण्यासारखें होतें. सायंकाळीं डोळस यांच्या सदरेंत अबीरास तसाच थाट जमला होता; व उपदेशक वेदशास्त्र संपन्न लक्ष्मण पांडुरंग ( नागपूरकर बावा ) यांनीं पंचमंडळीच्या उद्देशास उद्देशून कथेचें अनुसंधान लाविलें होतें. हा उपदेश सर्वांच्या मनांत बिंबण्यासारखा होता; व त्या उपदेशावरून सार्वजनिक कामाचें महत्व, बंधुप्रीति, सत्यनिष्ठा, परोपकार, साधुसमागम, व ईश्वरभक्ती यांची मनुष्याच्या तारणोपायास अत्यावश्यकता आहे हें सर्वांस चांगलें दिसून आलें. घर मालक रा. रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस यांची या सार्वजनिक कामीं उत्साह बुद्धी पाहून पंचमंडळीच्या तर्फे त्या मंडळीच्या चिटणीसानें त्या प्रसंगीं त्यांचे आभार मानिले.

सन १८७९ व १८८० तील फाल्गुनोत्साह एक दोन गोष्टी खेरीज करून १८७८

सालाप्रमाणेंच झाला. या तिन्ही वर्षांतील फाल्गुनोत्साहाचा खर्च फंडावर ओझें न घालतां पंचमंडळीचे सभासद व ज्ञातींतील इतर कांहीं गृहस्थांनीं वर्गणीनें आपल्या पदरचा केला. शिमग्यांतील सर्व समारंभ जरी उत्तम प्रकारचा झाला तरी पंच मंडळीनें त्याचा खर्च फारच काटकसरीनें केला. फाल्गुनाप्रीत्यर्थ मंडळीस सन १८७८ सालांत रु. ६६–१–७ खर्च झाला. व तो पंच मंडळीच्या हुकूमावरून रा. गोपिनाथ दादाजी सारंगधर, रा. जगन्नाथ आंतोबा निरगुडे व रा. दामोदर पुतळाजी चवाथे यांनीं तपासिला. तसेंच सन १८७९ सालांत शिमग्यानिमित्य सर्व रु. ७४–३–९ खर्च झाला, व तो पंचमंडळीच्या हुकूमावरून रा. लक्षुमण पुरुषोत्तमजी किरावंत, रा. शिवशंकर भाई सासवडकर व रा. कृष्णा बंधूजी चवाथे यांनीं तपासिला. सन १८८० त शिमग्यानिमित्य सर्व खर्च रु. ७३–१२–९ झाला, व तो पंच-मंडळीच्या हुकूमावरून रा. रघुनाथ रामचंद्रजी ढगे, रा. नारायण भिकाजी ढगे व रा. गणपत नथुजी चवाथे यांनीं तपासिला. शिमग्याच्या वर्गणीच्या टिपेंत पंचमंडळी खेरीजकरून ज्ञातींतील इतर गृहस्थांनींही वर्गणी भरली होती ह्मणून हिशोब तपासण्यास पंचमंडळीच्या सभासदांबरोबर या मंडळीच्या बाहेरील मशारनिल्हे तिघां गृहस्थांची योजना केली होती. १८७९ व १८८० त घेरीच्या वेळीं घेरी न काढतां बैठकच केली, ह्मणून कांहींसा अधिक खर्च लागला. आपल्या पासून दुसरें कांहींच होत नाहीं, तरी ज्ञातींतील आबालवृद्धांची वार्षिक घेरी बंद करण्यास, व ती पण, दुसऱ्याच्या जिवावर बंद करण्यास, प्रतिपक्षांतील कांहीं मंडळीस फारच हातपाय आदळावे लागले.

आमच्या पूर्वजांनीं घेरीचा संप्रदाय लावून दिला आहे तो ज्ञातींत परस्परांत सर्वांचा स्नेहभाव वाढावा याच हेतूनें लावून दिला आहे. रंगसमाज, घेरी, चहा, धुलिवंदन, या प्रसंगीं ज्ञातींतील आबालवृद्धांचा एका ठिकाणी जमाव जमल्यामुळें सर्वांच्या भेटी व भाषणें होतात, जेणेंकरून ईश्वरनिर्मित मूर्तींची परस्परांस ओळख राहून त्यांचा स्नेह वाढत जातो. घेरीच्या दिवशीं सर्वांहीं एकत्र जमून समूहानें ज्ञातीच्या देवालयांत जाऊन तेथें देवदर्शन घेणें हें फारच उत्तम होय. असा हा क्रम वरींच वर्षे आपल्या ज्ञातींत निर्दोष चालला. निर्दोष ह्मणण्याचें कारण इतकेंच कीं ह्या वार्षिक दर्शन समारंभांत कांहीं दोष देण्यासारखें नव्हतें. परंतु अलीकडेस ह्या घेरीच्या बदला आपल्या ज्ञातींत "वरघोडा" निघूं लागला आहे. ह्या वरघोड्याचें सटीक वर्णन करण्यास फलद्रूप लेखणी पाहिजे, ह्मणजे त्याचें यथार्थ स्वरूप आमच्या परपेठींतील वाचकांच्या लक्षांत येईल. असंभावित असलीं त्रासोत्पादक चित्रविचित्र सोंगें घेऊन, ज्या छत्राखालीं त्या दिवशीं मानकऱ्यांवांचून इतरांस शिरण्यास अधिकार नाहीं असल्या छत्राखालीं एक अश्वारूढ कंटाळवाणें सोंग तयार करून फिरवावें व आपणास संभावित ह्मणविणारांनीं त्या सोंगापुढें वाद्यें लावून त्यांच्या कर्कश गजरांत

चालावें हें त्या वरघोड्याचें मुख्य स्वरूप होय. एकादा ज्ञातींत "वरघोडा" निघत असलां तर आपल्याही ज्ञातींत "वरघोडा" असावा असा समज बाळगणारांस पहिल्या प्रतीचे मूर्ख ह्मटलें असतां दोष नाहीं. कोणत्याही मनुष्याचे किंवा ज्ञातीचे वाईट गुण न घेतां त्यांच्या चांगल्या गुणांचा कित्ता घ्यावा हेंच शाहाण्या मनुष्याचें काम होय. ह्या व दुसऱ्या कारणांवरून पंचमंडळीनें घेरीचा संप्रदाय आज दोन वर्षें बंद केला आहे; ही एक सुधारणा होय असें ह्मटलें पाहिजे.

यंदांच्या शिमग्यांत नायकिणीच्या विड्यांत कांहीं कमी करून अबीराच्या दिवशीं उपदेशकाची दक्षिणा वाढविली.

मयत मोरोबा फकिरजी यांस निवर्तून अजून सात महिने झाले नाहींत, व त्यांच्या मरणाचें दुःख कनिष्ट त्यांच्या संन्निधच्या सोयऱ्यांस व मित्रांस फार झालें असावें असें आह्मांस वाटत होतें. परंतु यंदांच्या शिमग्यांत बाळगोपाळांच्या नाचरंगाचा बेरंग करण्याकरितां मोरोबा फकिरजी यांच्या ओटीवर त्यांच्या कित्येक आप्त मित्रांनीं जी धुमाळी मांडिली त्यावरून तर त्या सर्वांस अत्यानंद झाल्याचें दिसलें. इतकेंच नव्हे, तर रा. रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस यांच्या सदरेंत आबालवृद्धांच्या रंगाच्या दिवशीं त्या रंगाचा बेरंग करावा या हेतुनें प्रतिपक्षांतील कित्येक दांडग्या लोकांनीं एका द्विपदास (ज्याचें उपनांव ढगे आहे) भर समाजांत दोन कपड्यांनी (पंच्या व कुडतें) पाठविला; व त्यानें कुसुंबा झोंकला होता ह्मणून असा भर मजलसींत येऊन दंगा करण्यास आरंभ केला; नंतर त्यास पोलीसचे शिपायांनीं हांकून लाविला.

सन १८८० च्या शिमग्या निमित्त जी वार्षिक सूचना प्रसिद्ध झाली ती येणेंप्रमाणें:—

---

(१) गुणांनींच उंचपणा येतो, परंतु उंच आसनावर बसल्यानें येत नाहीं; राजवाड्याच्या सज्यावर कावळा बसला ह्मणून तो मोराच्या योग्यतेस येणार नाहीं.

## कोंकणस्थ नामदेव शिंपी मंडळीस वार्षिक सूचना.

"आह्मी मानकरी! आह्मी पिढिजादा मानकरी! आमच्या 'आर्डरी' (लेखी हुकूम) आल्यावांचून ट्रस्टीस फंडांतून कसलाही खर्च करण्यास अधिकार नाहीं! पंच मंडळीचे सभासद हीं पोरें! आमच्या पदवीचें व योग्यतेचें त्यांत कोणीच नाहीं! आह्मी समापत्रावर शेरा लिहिल्यानें तें आह्मी रद्द करून टाकलें आहे!" असले हे आमच्या पदच्युत मानकऱ्यांचे पोक्त व अलंकृत (हलकट व दांडगे ह्मटलें असतां कदाचित् त्यांस राग येईल) उद्गार ऐकून जसें आह्मांस दुःख वाटतें, तसेंच आबालवृद्धांनीं त्यांचे मानपान बंद केल्यानें जी त्यांची अप्रतिष्ठा होती ती पाहून आह्मांस त्यांची दयाही येते. परंतु आज २ वर्षें होत आलीं तरी दुरभिमान व स्वार्थ त्यांस सोडतो काय? ज्ञातिफंड हा सर्वांचा आहे, व त्यावर मानकऱ्यांचाच हक्क व अधिकार असावा हें गैर होय, वाणी लोकांनीं आपल्या महाराजांस दान केलेल्या द्रव्याप्रमाणें हा जर ऐवज असता तर आमच्या माजी मानकऱ्यांचा हक्क व अधिकार चालता व शोभता; परंतु तसें नसून ते जो दुराग्रह धरून बसले आहेत त्यावरून त्यांची स्वार्थ बुद्धी मात्र स्पष्ट दिसते. समा-

पत्राचें कलम दुसरें; तसेंच नियमाचें प्रकरण दुसरें; व नियम ३२, ३६, ३८, ३९, ४० व ४१ हीं पुनः एकदा वाचून पाहिलीं असतां सर्वांस स्पष्ट उमजेल कीं, मानकरी समापत्रास व नियमांस अनुसरून वागले असतां त्यांची अप्रतिष्ठा व मानहानि बिलकुल होणार नाहीं, परंतु त्यांचा मानमरातब वाढेल. कोणताही नियम, किंवा समापत्रांतील एखादें कलम वावगें आहे हें ह्मणण्यास त्यास हिय्या होईना. त्यांत कांहीं वावगें असतें तर प्रतिपक्षांतील अशिक्षीत चिकित्सकांनीं अनेक उपनेत्र लावून केव्हांच त्याचें विदारण केलें असतें. माजी मानकरी रा. मोरोबा बाळाजी गुजर यांनीं समापत्रावर शेरा लिहितांना आपल्या खुद्द सहीनिशीं सर्व समापत्र व नियम मान्य केले आहेत. ज्ञातीच्या कामांत, व प्रसंग पडल्यास ज्ञातिफंडाच्या बाबतींत निष्पक्षपातानें चालवणार नाहीं ह्या भितीनेंच मात्र समापत्रांतील १० कलमांत जाणविल्याप्रमाणें गीतेवर शपथ घेण्यास त्यांनीं नाकारिलें. आपल्या मंडळींतील अकटोविकट विद्वानांच्या साक्षानें माजी मानकऱ्यांनीं समापत्र व नियम चाळून ते सर्व मोरोबा बाळाजी व कृष्णशास्त्री ( यांनीही समापत्रावर शेऱ्या खालीं सही केली आहे ) यांच्या द्वारें कबूल केले आहेत; ह्यावरून हें निर्विवाद ठरतें कीं समापत्र व नियम हीं जातीस हितावह असून त्यांची ज्ञातीस फारच अवश्यकता आहे. असें असतां माजी मानकऱ्यांनीं स्वार्थ मिश्रित दुरभिमानांत गर्क होऊन आबालवृद्धांनीं केलेल्या समापत्राच्या नाशास प्रयत्न करणें हा गुण नव्हे, परंतु अवगुण होय. एतद्विषयीं ह्या पत्रकाच्या चतुःसिमा पाहाव्या.

गेल्या रविवारीं रा. रा. रामकृष्ण लक्षुमणजी डोळस यांच्या सदरेंत ३ वाजतां आबालवृद्धांची सभा भरली होती, तेव्हां ३६ व्या नियमाप्रमाणें अध्यक्षस्थानीं रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांची योजना झाल्यानंतर, रा. त्रिंबक नथुजी घेवडे, रा. भाऊ हरिश्चंद्रजी निरगुडे, रा. केशव चंदु गुजर, रा. हरि अंतोबा निरगुडे, रा. माणीकचंद सखाराम कवें, रा. लक्षुमण भाऊ केदारे, व शिवशंकर मलोजी चवाथे यांनीं भाषणें केलीं. पहिल्यानें अध्यक्षांनीं फंडाचा व समापत्राचा नाश व पंचमंडळीचा मोड करण्याकरितां प्रतिपक्ष जे प्रयत्न करीत आहेत त्यावर बरेंच भाषण केलें, व समापत्रावर ज्यांनीं सह्या केल्या आहेत त्यांच्या वर्तनाविषयीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या. सर्व भाषण करणारांनीं विषयास व प्रसंगास अनुसरून चांगल्या प्रकारचीं भाषणें केलीं. येथें हें ह्मणणें योग्य दिसतें कीं रा. हरि अंतोबा निरगुडे हे जरी फारसे पढलेले नाहींत तरी त्यांचें भाषण नेहमी रसीक असतें. ह्या प्रसंगीं मंडळीचा बराच जमाव होता; व हजर असलेल्यांतून बहुतेकांनीं, सर्वच ओझें पंचमंडळीवर पडूं नये ह्मणून, स्वेच्छेनें शिमग्याच्या खर्चाकरितां टिपेंन आंकडे भरले, व कित्येकांनीं त्याचवेळेस चुकवून दिले.

सभाविसर्जन करण्यापूर्वीं अध्यक्षांनीं अशी सूचना केली कीं माजी मानकरी स्वतः त्यांच्या नाचरंगास यावें ह्मणून आमंत्रण करण्यास आले व त्यांनीं कितीही भिड खार्चली व आग्रह केला तरी त्यांच्या नाचरंगास समापत्रावर सह्या केलेल्यांपैकीं कोणी जाऊं नये; परंतु सर्वांहीं रा. रा. रामकृष्ण लक्षुमणजी डोळस यांच्या येथें तारीख २२ सोमवार रोजीं रात्रीं रंगास, तारीख २६ शुक्रवार रोजीं ३ वाजतां बैठकीस, तारीख २७ शनवार रोजीं सकाळीं ७ वाजतां काफीस, तारीख २८ रविवार रोजीं सकाळीं ९ वाजतां धुलीवंदनास व सायंकाळीं ५ वाजतां अबीरास यावें.

पंचमंडळीच्या हुकूमावरून
**शिवशंकर मलोजी चवाथे,**
चिटणीस.

मुंबई, तारीख २० मार्च सन १८८०.

( २ ) गुण हेंच लोकांना मान्य होतात; त्याबद्दल त्या मनुष्याचें कूळ किंवा त्याचे आईबाप यांजकडे कोणी पाहात नाहीं. दशरथराजाचा मुलगा रामचंद्र; परंतु दशरथास टाकून लोक रामचंद्रास भजूं लागले. त्याचप्रमाणें वसुदेवास टाकून वासुदेवास ( कृष्णास ) भजूं लागले!

( ३ ) गुणांनींच लोकांस मान मिळतो, नुसत्या संपत्तिनें मिळत नाहीं; पूर्णचंद्रापेक्षां द्वितीयेच्या चंद्रासच लोकांत ज्यास्त मान मिळतो!

( ४ ) गुणवानाचा सहवास असला ह्मणजे सर्वत्र गौरव प्राप्त होतो; यःकश्चित सुत जर फुलाच्या आश्रयास असेल तर पुष्पमालेबरोबर तेंही मोठमोठ्या लोकांच्या डोक्यावर बसेल, किंवा त्यांच्या गळ्यांत वास करील. त्याचप्रमाणें फुलांतील सुगंधीही देवाच्या मस्तकावर बसेल.

( ५ ) रेशमी किड्यापासून पीतांबर होतो; पाषाणा ( कसोटीचा दगड ) पासून सोन्याची परिक्षा होते. शेण मातीपासून मोगऱ्या गुलाबाची फुलें होतात, आणि लांकडापासून अग्नि उत्पन्न होतो. तेव्हां कोणत्याही वस्तुंची त्यांच्या उत्पत्ति स्थानावरून किंमत नसून केवळ त्यांच्या गुणावरूनच किंमत होते!—**बोधवचनें.**

रा. वासुदेव बाळाजी मुरांजण यांनीं आपल्या मुलाच्या लग्न प्रसंगीं ज्ञातीस जेवण दिलें, व त्यांस ज्ञातींतील समस्तांच्या पंक्तीचा लाभ घडावा ह्मणून पंचमंडळीस ते स्वतः पाचारण करण्यास आले होते, व त्याकडून एक निमंत्रण पत्रही आलें होतें. तें पत्र व त्याचा पंचमंडळीकडून जवाब हीं येणेंप्रमाणें:—

॥ श्री. ॥

रा. रा. शिवशंकर मलोजी,

कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातीच्या सभेचे चिटणीस यांस:—

विनंती विशेष. आमच्या एथें उदयिक शुक्रवारीं लग्न निमित्तानें ज्ञातिभोजन आहे याजकरितां कृपा करून आपल्या सर्व सभासद वगैरे मंडळीसहित आपण अगत्य रात्रीस भोजनास यावें. कळावें लोभ करावा हे विनंती. ता. २९ एप्रिल १८७८ इसवी.

(सही) वासुदेव बाळाजी मुरांजण व चिरंजीव.

---

मुंबई तारीख २९ एप्रिल १८७८.

रा. रा. वासुदेव बाळाजी मुरांजण यांस,

महाराज,

विनंती विशेष. आपलें आजच्या तारखेचें पत्र म्या आज रोजीं भरलेल्या पंचमंडळीच्या सभेस सादर केलें. त्यावर बराच विचार होऊन मंडळीनें असा ठराव केला आहे कीं, जोंपर्यंत आपण ज्ञातींतील आबालवृद्धांनीं केलेल्या समापत्रावर सही करणार नाहींत तोंपर्यंत मंडळीच्यानें आपल्या आमंत्रणाचा स्वीकार करवत नाहीं. हा जवाब देण्यास मंडळी खिन्न आहे, परंतु आपलें उचित कर्तव्य करावें या हेतूनें पंचमंडळीनें हा आपला ठराव मला आपणास विदित करण्यास फरमाविलें आहे.

आपला सेवक,

शिवशंकर मलोजी.

---

मध्यंतरीं पंचमंडळी व प्रतिपक्ष यांचा बराच पत्रव्यवहार झाला. परंतु त्यांत ह्या वृत्तांतांत दिलेल्या पत्राची पुनरुक्ति असल्या कारणानें त्याचा विचार करणें नको.

अलिकडेस प्रतिपक्षांनीं ज्ञातीच्या माहिमचे घराचें एक खूळ उभें केलें आहे. हें घर बांधण्यास ट्रस्टींनीं फंडांतून दोन हजार रुपये द्यावे ह्मणून पदच्युत मानकऱ्यांनीं ट्रस्टीस चिठ्ठी पाठविली आहे; परंतु ते रुपये कोणाच्या स्वाधीन करावे याविषयीं कांहींच लिहिलें नाहीं. हें काम पांडुरंगजी ट्रस्टी नौकरीवाले मनुष्य असल्यावरून त्यांच्यानें उरकणार नाहीं. त्यांचे सम ट्रस्टी जयरामजी दिघे (जे हल्लीं पेन्शनर आहेत) कदाचित् त्यांचेच कुटुंबी कृष्णाजी दिघे यांचे मदतीनें करूं शकतील. रा. पांडुरंगजी ट्रस्टी व पंचमंडळी यांचा

विचार असा आहे कीं, तें घर विकून टाकावें, व त्याचें मोल फंडांत जमा करावें; कारण जर तें घर फंडांतून बांधूं लागले तर त्याच्या खर्चाची व्यवस्था कोणी पाहावी व तें तयार झाल्यानंतर एखादा मनुष्य तेथें दोन दिवस राहाण्याच्या निमित्तानें जाऊन तें घरच बळकावून बसला तर त्यास घरांतून काढण्याकरितां खर्च व खटपट ती कोणी करावी? व असें होण्याचा संभव आहे कीं नाहीं? संभव तर काय, पण असल्या गोष्टीचा खचितार्थ आहे. यास एक उदाहरण बस आहे; तें हें कीं, आज इतके वर्षें पांडुरंगजी ट्रस्टी माहिमच्या उरुसाच्या संधींत ह्या घराचें दर वर्षास सुमारें ४०, ५० रुपये उत्पन्न करीत असत, परंतु आज दोन वर्षें जयरामजी ट्रस्टी व कृष्णाजी दिघे हे दरसाल २५ रुपयांचेंच मात्र उत्पन्न दाखवितात. ह्या घराची देखरेख जेव्हां पांडुरंगजींच्या स्वाधीन होती तेव्हां ते त्या घराची चावी माहिमास राहाणारे रा. नारायण राघोबा गोरे यांच्या स्वाधीन करीत असत. ती चावी ज्यानें आपल्या स्वाधीन केली त्यासच परत द्यावी हें नारायणजीस योग्य होतें, परंतु त्यांनीं तसें न करितां चावी प्रतिपक्षाच्या स्वाधीन केली. ह्यामुळें भाड्याची नुकसानी झाली ह्यांत बिलकूल संशय नाहीं. आतां ह्या वर्षास २५ रुपयांचा तोटा तो कोणी सोसावा? फंडानें, कीं जयरामजी ट्रस्टींनीं? असल्या ह्या दुःखामुळें पंचमंडळीनें पांडुरंगजीस घर विकण्यास सल्ला दिली हें ठीक केलें हें सांगणें नको.

---

स्वपराक्रमानें मोठ्या उदयास आलेल्या अशा एका नामांकित पारशी गृहस्थानें कांहीं कारणावरून पंचमंडळीवर उपकार केल्यामुळें त्या मंडळीनें त्या नामदार गृहस्थास १८७९ मार्च ता० २४ रोजीं कृतज्ञता दर्शक पत्र पाठविलें.

---

२१ व्या नियमास अनुसरून ट्रस्टी रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांनीं फंडाचा १८७७ सालचा हिशोब पंचमंडळीस सादर केला तो येणेंप्रमाणें:—

मुंबई ता. १ ली जुलै सन १८७८.

रा. शिवशंकर मल्लोजी चवाथे,

पंचमंडळीचे चिटणीस यांस.

महाराज,

२१ साव्या नियमास अनुसरून ज्ञातिफंडाचा हिशोब, व तत्संबंधीं सर्व कागद पत्रें व चोपड्या मी आपणाकडे पाठविल्या आहेत. तें सर्व आपण पंचमंडळी पुढें ठेवावें.

मी अत्यंत दिलगीर आहें कीं माझे बंधु ट्रस्टी रा. जयरामजी अंतोबा दिघे हे पदच्युत मानकऱ्यांच्या बुद्धीस लागून अजून आपला हट्ट सोडीत नाहींत, नाहीं तर त्यांच्या येथेंही जमा झालेले विड्यांचा हिशोब ह्या हिशोबांत आला असता.

आपला सेवक,

पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने,—ट्रस्टी.

श्री कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातीचा फंड ट्रस्टी मयत चंदु रघुनाथजी ढगे, व जयराम आला, त्याचा सन १८७७ सालच्या हिशोबाचा ताळा येणेंप्रमाणें:—समस्त आबालवृद्धांनीं सावे नियमाप्रमाणें मी हा हिशोब सादर केला आहे. विरुद्ध मंडळीचे स्वाधीन झालेले विडे,

| जमा. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक... ...................... | २६.१६२ | ४ | ८ | २६,१६२ | ४ | ८ | |
| **व्याजखातें—** | | | | | | | |
| सरकारी नोटींचे व्याज......... | ५९१ | ८ | ० | | | | बापूजी नारायण मेंगळे यानीं नेमिलेले रा. वासुदेव बाळाजी मुरांजण, भिकाजी बाबाजी ढगे, दामोदर बाळाजी सारंगधर, नारायण रघुनाथ ढगे, नारायण फकीरजी ढगे व काशिनाथ दुंदाजी खांबेकर यांस ट्रस्टींच्या दफतराचा झाडा देत नाहींत हें निमित्त सांगून जयराम शेट आणखी चढलेलें व्याज आणावयास येत नाहींत. |
| सेविंग ब्याकेंतल्या ऐवजाचें व्याज.. | १५ | १३ | ९ | | | | |
| | | | | ६०७ | ५ | ९ | |
| माहीमच्या घराचें खातें......... | १ | ८ | ० | | | | |
| | | | | १ | ८ | ० | या घराची डागडुजी करून मागील वर्षाप्रमाणें उरूसांत भाडें ४० रुपये येतील अशी आशा करीत होतों, इतक्यांत कृष्णा सखाराम दिघे यांनीं नारायण राघोबा गोरे याच्या मदतीनें तें घर एका भटाऱ्यास रु. २५ सास भाड्यानें देऊन त्यांतून कांहीं खर्चहि केला व बाकी जयराम शेट यांस दिली. |
| **टिळ्या विड्याचें खातें—** | | | | | | | |
| सोयरीकीचे इ. विडे आले ...... | ९३ | ४ | ० | | | | |
| | | | | ९३ | ४ | ० | |
| **श्री विठोबाचें नैवेद्याचें खातें-** | | | | | | | |
| गंगादास बावास अन्नकोटास दिले ते त्यानीं परत दिले ........ | २५ | ० | ० | | | | |
| | | | | २५ | ० | ० | |
| **दंडाचें खातें—** | | | | | | | |
| दंड ........................ | २ | ० | ० | | | | |
| | | | | २ | ० | ० | |
| | | | | १६,८९१ | ६ | ५ | |

अंतोबा शेट दिघे व पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांच्या स्वाधीन सन १८६६ सालांत सन १८७७ जुलै तारिख २९ रोजीं केलेल्या समापत्रान्वयें नेमिलेल्या पंच मंडळीस २१ व माहीमच्या घराचें त्या सालचें भाडें इ. ट्रस्टी जयराम अंतोबा शेट दिघे यांचे स्वाधीन आहे.

| उधार. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **माहीमच्या घराचें खातें—** | | | | | | | |
| फजिनदाराचीं ९ वर्षाचीं बिलें चुकविलीं................ | ४० | ८ | ० | | | | |
| म्युनिसिपालचीं बिलें चुकविलीं ... | ९ | १४ | ४ | | | | |
| घराची डागडुजी करविली...... | ६ | १० | ० | | | | |
| पांडुरंगजी ट्रस्टी यांस गाडीभाडें... | ० | ११ | ० | | | | |
| | | | | ५७ | ११ | ४ | |
| **टिळे विद्याचें खातें—** | | | | | | | |
| गंगाधर विठोबा निलकंठ यास पगार रुपये ५ प्रमाणें ... ... | ३० | ० | ० | | | | |
| नंदुबाईस चरितार्थासाठीं रु. २ प्रमाणें.................... | २४ | ० | ० | | | | |
| लक्ष्मण दामोधर नाईक यास रु.४ प्रमाणें ... ............... | ३६ | ० | ० | | | | |
| बाराणशी बाईस रु. ३ प्रमाणें... | २७ | ० | ० | | | | |
| ठकुबाईस रु. २ प्रमाणें ... ... | ४ | ० | ० | | | | |
| शिमग्याचा खर्च, नाच, रंग, चाहा, अबीर वगैरे ... ...... | ९६ | ७ | ० | | | | |
| भांडीं विकत घेतलीं व तक्के करविले. | ४५ | ५ | ३ | | | | |
| हेल मजुरी ................ | १ | ० | ९ | | | | ट्रस्टी पांडुरंग हरिश्चंद्रजी यांच्या स्वाधीन पंचायतीचें सामान आहे त्याची विगत.— |
| सन १८७६ चे हिशोबाची छापणावळ... ... ........... | ३ | ८ | ० | | | | १ पेटी, व १ लहान पेटी, २४ पितळेच्या चाहाच्या वाट्या. |
| उजळणी निमित्य गरिबांस दाण वांटला त्यांत रु.४-४-० अधिक खर्चले ते पुढले सालांत उधारले आहेत... ... ........... | १९५ | ० | ० | | | | **पंदांच्या सालीं घेतलेलें सामान.** |
| | | | | ४६२ | ५ | ० | २ गुलाब दाण्या*... २- ४-०<br>२ पितळेचीं ताटें ... ४-११-३ |
| **पुशीचें खातें—** | | | | | | | १ सामान ठेवण्यास पेटी... ... ... १- २-० |
| वाडी निमित्य खर्च............ | ७ | ० | ० | | | | |
| | | | | ७ | ० | ० | १४ तक्के*......... १८- ८-६ |
| | | | | ५२७ | ० | ४ | १ तपेला व १झाकण. १८-११-६ |
| (पुढें चालू.) | | | | | | | ४५- ५-३ |

* यांतून एक रुपेरी गुलाबदाणी व ३ तक्के मोरोबा बाळाजी गुजर यांनीं मागून नेली ती ते परत देत नाहींत.

टूस्टींनीं ज्ञातिफंडांचा सन १८७७ सालचा पंचमंडळींस

( मागल्या पृष्ठावरून

| जमा. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील पृष्ठावरून... | | | | १६,८९१ | ६ | ५ | |
| रुपये... | | | | १६,८९१ | ६ | ५ | |

**शिलकेची विगत—**

| | रु. | आ. | पै. |
|---|---|---|---|
| मुंबई सेव्हिंग्स ब्यांकेंत... ... ... ... ... ... ... ... | १,३०५ | १ | ६ |
| मयत ट्रस्टी चंदु रघुनाथजी यांजवर बाकी, जी त्यांच्या मुलाजवळ पुष्कळवेळा मागितली परंतु ती ते अजून देत नाहींत ... ... ... ... ... | ४ | १० | ० |
| ट्रस्टी पांडुरंगजीचे जवळ बाकी... ... ... ... ... ... ... | २६ | ११ | १० |
| ट्रस्टी चंदू शेट यांस तारिख १९ जून सन १८७२ च्या डिक्री बरहुकूम रुपये ९,००० देण्याकरितां ९ प्रामिसरी नोटी विकून बाकी राहिलेल्या १४ नोटींची मूळची किंमत ... ... ... ... ... ... ... | १४,७०० | ० | ० |
| रुपये... | १६,११६ | ७ | ४ |

२१ व्या नियमाप्रमाणें सादर केलेला हिशोब.
पुढें चालू ).

| उधार. | रु. | आ. | पै. | रु. | आ. | पै. | शेरा. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मागल्या पृष्ठावरून.... | | | | ५२७ | ... | ४ | |
| **स्मशान खातें—** | | | | | | | |
| अनाथ प्रेतसंस्कार...... ...... | १३ | ... | ... | | | | |
| | | | | १३ | ... | ... | |
| **श्रीविठोबाचे नैवेद्याचें खातें—** | | | | | | | |
| देवळांत मथुरादास बावाचे साहा महिन्याचे बैरागी जेवणासाठीं दाणा इत्यादि............... | ८९ | १३ | ... | | | | |
| गंगादास बावास पोषाक दिला... | ७० | ९ | ९ | | | | हा पोषाख बावानीं रा. मोरोबा बाळाजी यांस परत दिला, तो मोरोबानी अजून आपणाजवळच ठेविला आहे. |
| गंगादास बावास अन्नकोटासाठीं.. | २५ | ... | ... | | | | |
| देवळांतील उत्साह निमित्य....... | ४८ | ... | ... | | | | |
| | | | | २३३ | ६ | ९ | |
| महालक्ष्मीचे दीपमाळेचा खर्च... | १ | ८ | ... | | | | |
| | | | | १ | ८ | ... | |
| | | | | ७७४ | १५ | १ | |

संवत् १९३४ मार्गशिर्ष वद्य १३ }
जानुआरी सन १८७८. } श्री शिल्लक. १६,११६—७—४.

( सही ) **पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने,—ट्रस्टी.**

We hereby certify that the above account is correct according to entries in books.

*Bombay*, 17*th* *November* 1878. } (Signed) GOPINATH DADAJI S.
" CASSINATH BALLAJEE.
" ANUNT WASSOODEW NAIK.
*Auditors.*

हा हिशोब तपासण्याकरितां पंचमंडळीनें रा. गोपिनाथ दादाजी सारंगधर, रा. काशिनाथ बाळाजी मुरांजण, व रा. अनंता वासुदेव नाईक यांस नेमिलें होतें. त्यांनीं तो तपासून हिशोबाच्या खालीं आपला शेरा लिहिला आहे. ह्या सालीं शिल्लक १६,११६—७—४ रुपये दाखविली आहे.

२१ व्या नियमाप्रमाणें रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी ट्रस्टी यांनीं फंडाचा सन १८७८ सालचा हिशोब पंचमंडळीस सादर केला तो येणेंप्रमाणें:—

ताळा २१ व्या नियमा प्रमाणें पंचमंडळीस सादर केला असे.

| जमा. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक मागील सालची......... | | | | | | | १६,११६ | ७ | ४ |
| टिळे विद्यांचें खातें......... | | | | ५८ | ९ | ० | | | |
| व्याज खातें— | | | | | | | | | |
| रु. १०,७०० च्या ४॥ टक्याच्या सरकारी नोटींचें व्याज आलें...... | ४८१ | ८ | ० | | | | | | |
| रु. ४,००० च्या ५॥ टक्याच्या नोटींचें व्याज.. | २२० | ० | ० | | | | | | |
| ह्या नोटी ४॥ टक्यांत बदलल्या तेव्हां व्याज आलें. | २०२ | ४ | ५ | | | | | | |
| सेविंग ब्यांकेनें यंदा व्याज जमेस धरलें......... | ५१ | १० | ० | | | | | | |
| | | | | ९५५ | ६ | ५ | | | |
| | | | | | | | १,०१३ | १५ | ५ |
| | | | | | | | १७,१३० | ६ | ९ |

| उधार. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| टिळे विद्यांचें खातें— | | | | | | | | | |
| नंदुबाईस पोटगीस......... | २ | ० | ० | | | | | | |
| वाराणसी बाईस......... | ३ | ० | ० | | | | | | |
| लक्ष्मण दामोदर नाईक यांस.... | ४ | ० | ० | | | | | | |
| ठकुबाईस......... | २ | ० | ० | | | | | | |
| | | | | ११ | ० | ० | | | |
| परचुरण खर्च......... | | | | ६ | १२ | ० | | | |
| दिपवाळी निमित्य गरीबांस दाणा इ० वांटला त्याचे खर्चापोटीं......... | | | | २०४ | १० | ३ | | | |
| | | | | | | | २२२ | ६ | ३ |
| श्री विठोबाचे नैवेद्याचें खातें— | | | | | | | | | |
| अन्नकोटासाठीं गंगादास बावास.... | ५० | ० | | | | | | | |
| कार्तिकी एकादशीचे कीर्तनास ... | ६ | ० | | | | | | | |
| | | | | ५६ | ० | ० | ५६ | ० | ० |
| व्याजाचें खातें रु. २,००० च्या ४॥ टक्याच्या नोटी विकत घेतलेल्यांवर व्याज चढलेलें चुकाविलें......... | | | | ४२ | १२ | ५ | | | |
| माहीमचे घराचें खातें......... | | | | ३ | ४ | ० | | | |
| पुशीचें खातें......... | | | | १८ | ० | ० | | | |
| स्मशान खातें......... | | | | १४ | ० | ० | | | |
| | | | | | | | ७८ | ० | ५ |
| शिल्लक बाकी सेव्हिंग ब्यांकेंत...... | | | | २६ | ११ | ६ | | | |
| मयत ट्रस्टी चंदु रघुनाथजीवर...... | | | | ४ | १० | ० | | | |
| ट्रस्टी पांडुरंग यांजवळ रोख...... | | | | ३२ | १० | ७ | | | |
| सरकारी ४॥ टक्याच्या २१ नोटी... | | | | १६,७०० | ० | ० | | | |
| | | | | | | | १६,७७४ | ० | १ |
| | | | | | | | १७,१३० | ६ | ९ |

हिशोब तपासून पाहतां सर्व बरोबर आहे.

(सही) बंधु सखाराम घेवडे,
,, सदाशिव बंधु चवाथे,
,, नारायण भिकाजी ढगे,
} हिशोब तपासनीस.

फेब्रुआरी, सन १८७९ इसवी.

पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने,
ट्रस्टी.

हा हिशोब तपासण्यास पंचमंडळीनें रा. बंधु सखाराम घेवडे, रा. सदाशिव बंधु चवाथे, व रा. नारायण भिकाजी ढगे नेमिलें होतें. त्यांनीं तो हिशोब तपासून पाहून त्याच्या खालीं आपला शेरा लिहिला आहे. ह्या सालीं फंडाची शिल्लक १६,७७४-०-१ दिसते.

२१ व्या नियमा प्रमाणें ट्रस्टी रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांनीं पंचमंडळीस सन १८७९ चा फंडाचा हिश
सादर केला. तो पंचमंडळीच्या हुकूमावरून रा. रघुनाथ रामचंद्र दगे, रा. केशव चंदु गुजर, व रा. जनार्दन धाकजी भो
यांनीं तपासिला. ह्या सालीं फंडाची शिल्लक रु. १७,१५३–६–४ आहे. तो हिशोब येणेंप्रमाणें:—

कोंकणस्थ नामदेव शिंपी ज्ञातिफंडाची वहिवाट सन १८७९ सालांत ट्रस्टी रा. जयराम अंतोबा शेट दिघे व पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांचे मार्फत झाली तिचा हा हिशोब २१ वे नियमा प्रमाणें पंचमंडळीस सादर केला असे. ता. ३१ जानेवारी सन १८८०

| जमा. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| शिल्लक मागले सालची.............. | | | | १६,७७४ | ० | १ |
| टिळे विद्याचें खातें ................ | | | | ४२ | १० | ० |
| व्याज खातें— | | | | | | |
| सरकारी ४॥ टक्याच्या (नोटींचें) रुपये १०,७०० चें ६ महिन्याचें......... | २४० | १२ | ० | | | |
| सेविंग ब्यांकेनें यंदा व्याज जमेस धरलें.. | २३ | १५ | ३ | | | |
| सरकारी ४॥ टक्याच्या रु. १२,७०० चें. | २५९ | ० | ० | | | |
| सरकारी ४॥ टक्याच्या रु. ६,१०० चें ६ महिन्याचें.................... | १३५ | ० | ० | | | |
| | | | | ६५८ | ११ | ३ |
| श्रीविठोबाचे नैवेद्याचें खातें...... ...... | | | | २ | ३ | ० |
| हिशोब तपासून पाहतां सर्व बरोबर आहे. | | | | १७,४७७ | ८ | ४ |

| उधार. | रु. | आ | पै. | रु. | आ | पै. |
|---|---|---|---|---|---|---|
| टिळे विद्याचें खातें— | | | | | | |
| नंदुबाईस पोटगी निमित्य........... | २ | ० | ० | | | |
| गरीब लोकांस दिपवाळी निमित्य दाणा, तूप, साखर इ० वांटला त्याचा खर्च... | १२७ | ८ | ० | | | |
| | | | | १२९ | ८ | ० |
| स्मशान खातें........................ | | | | ५ | ० | ० |
| महालक्ष्मीचे दीपमाळेचें खातें— | | | | | | |
| मागले व यंदाचे सालचा खर्च. ...... | | | | ३ | ० | ० |
| श्रीविठोबाचे नैवेद्याचें खातें— | | | | | | |
| रामनवमीचे उत्सवाचा खर्च ........ | १८ | ० | ० | | | |
| जयराम शेटनीं मागले वर्षी रामनवमी, गोकुळाष्टमी इ०साठीं खर्चलेले चुकवले. | ४३ | १० | ० | | | |
| आषाढी ११ व गोकुळ अष्टमीचा खर्च... | २४ | ० | ० | | | |
| जगन्नाथबावास अन्नकोटास दिले. ... | ७५ | ० | ० | | | |
| कार्तिकी एकादशीचा खर्च ........ | ६ | ० | ० | | | |
| | | | | १६६ | १० | ० |
| वाडी खातें— | | | | | | |
| पौषाचे व चैत्राचे वाडीचा खर्च... ... | | | | २० | ० | ० |
| बाकी— | | | | | | |
| मुंबई सेविंग ब्यांकेंत ............ | ३९७ | १० | ९ | | | |
| मयत ट्रस्टी चंदु रघुनाथ यांजवर बाकी... | ४ | १० | ० | | | |
| ट्रस्टी पांडुरंग हरिश्चंद्रजी जवळ....... | ४८ | १२ | ११ | | | |
| ट्रस्टी जयराम अंतोबा यांच्या स्वाधीन.... | २ | ४ | ८ | | | |
| सरकारी ४॥ टक्याच्या नोटी........ | १६,७०० | ० | ० | | | |
| | | | | १७,१५३ | ६ | ४ |
| | | | | १७,४७७ | ८ | ४ |

(सही) जनार्दन धाकजी भोजने,
,, केशव चंदु गुजर,
,, रघुनाथ रामचंद्र दगे
} हिशोब तपासनीस,

(Signed) PANDOORUNG HURRICHANDJEE.

अनाथांस मिठाईच्या साहित्या निमित्त सन १८७७ च्या दिपवाळींत १९९ रुपये खर्च झाला; १८७८ च्या दिपवाळींत रु. २०४-१०-३ खर्च झाला, व १८७९ च्या दिपवाळींत रु. १२७-८-० खर्च झाला. पहिल्या सालचा खर्च पंचमंडळीच्या इच्छेप्रमाणें रा. मोरोबा सदाशिव शेट पतंगे व रा. नारायण अंतोबा मेंगळे यांच्या हातून झाला. तसेंच दुसऱ्या व तिसऱ्या सालचा खर्च पंचमंडळीच्या हुकुमाप्रमाणें उभय ट्रस्टींनीं केला. ६६ व्या नियमाप्रमाणें दिपवाळींत दाणा व मिठाईचें साहित्य जे खरोखर अनाथ असतील त्यांसच मिळावें, परंतु ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं कित्येक आपला चरितार्थ चालविण्यास समर्थ असून देखील तें मागण्यास येतात. ह्याचा बंदोबस्त वांटणारांकडून चांगला झाला पाहिजे.

पंचमंडळीच्या सभासदांपैकीं रा. नानाभाई अनंताजी भोजने, मयत भास्कर दामोदर सारंगधर, व रा. विश्वनाथ लक्ष्मणजी निळकंठ यांनीं १८७८ मार्च ता. ३१ रोजीं आपल्या पंचाधिकाराचा राजिनामा दिला. तसेंच रा. त्रिंबक नथूजी घेबडे यांनींही सन १८७९ मे ता. २० रोजीं आपल्या पंचाधिकाराचा राजिनामा दिला.

तसेंच रा. गणपत अंतोबा निरगुडे यांनीं १८७९ सालांतील धुळवडीच्या दिवशीं झालेल्या ज्ञातीच्या सभेंत आपल्या पंचाधिकाराचा राजिनामा देण्याची इच्छा दर्शविल्यावरून पंचमंडळीनें १८७९ मार्च ता. २२ रोजीं त्यांचा राजिनामा कबूल केला.

रा. विश्वनाथ लक्ष्मणजी निळकंठ यांनीं पुन्हा पंचमंडळीचे सभासद व्हावें ह्मणून पंचमंडळीस लेखी अर्ज केला; त्यावरून १८७९ मार्च ता. २२ च्या सभेंत त्यांचा अर्ज कबूल करून पहिल्याच शपथेवर त्यांचें नांव सभासदांच्या पटांत नोंदिलें.

१८७९ जानेवारी ता. ९ रोजीं रा. नारायण अंतोबा मेंगळे यांनीं एक इंग्रजी पत्र लिहून आपल्या पंचाधिकाराचा राजिनामा दिला. ह्या पत्रांत त्यांनीं निरर्थक पंचमंडळीची निर्भत्सना केली आहे. समापत्र व पंचमंडळी उपस्थित करण्याचे कामांत रा. नारायण अंतोबा मेंगळे अग्रेसर असून त्या कामाकरितां ते एक वर्ष पर्यंत मोठ्या शौर्यानें लढले. परंतु घरगुती खटल्यांत आपले पंचमंडळीच्या एका सभासदाबरोबर वितुष्ट पडलें ह्मणून सार्वजनिक कामाकडे दुर्लक्ष करून ते पंचमंडळीचा द्वेष करूं लागले. इतकेंच नाहीं तर त्या मंडळीचा मोड करण्यास ते प्रवृत्त झाले. सन १८७७ मे ता. १४ रोजीं नागदेवळाच्या सभामंडपांत भरलेल्या आबालवृद्धांच्या सभेंत नारायण अंतोबा मेंगळे यांनीं सभेचें काम सुरूं होण्यापूर्वीं सभेस जी सूचना केली ती ते विसरले काय? तेवेळीं त्यांनीं उभें राहून देवळांतील देवाच्या मूर्तीकडे बोट करून असें ह्मटलें नाहीं काय कीं "येथें देवद्वारीं ज्ञातिगंगेच्या समुदायांत आपण बसलों आहों तेव्हां जें कांहीं बोलणें किंवा करणें तें ईश्वराची भिती बाळगून कोणाचा पक्षपात न धरतां सत्य व न्याय यांसच अनुसरून बोलावें." ( तूर्त नेमिलेल्या मंडळीच्या हकीकतीचें पृष्ट पहिलें पहा ). तसेंच नारायणजी अंतोबा मेंगळे यांनीं अभिषिक्त होतेवेळीं देवद्वारीं, व भागवत पारायण होत असतां समापत्रांतील दहाव्या कलमास अनुसरून हातीं भगवद्गीता घेऊन "पंचायती पुढें तपासण्याक-

रितां ज्या फिर्यादी येतील त्या सर्वांचा निवाडा मी धर्मन्यायानें व निष्पक्षपातानें करीत जाईन; व ज्ञातिसंबंधीं माझें सर्व उचित कर्तव्य मी निरालस्य प्रामाणिकपणें बजावीत जाईन " अशी सर्व आबालवृद्धांसमक्ष प्रतिज्ञा करून गीता वंदन केली कीं नाहीं? असें असून सार्वजनिक कामांत ( जें काम त्यांनीं उद्भवलें ) नारायणजी सारख्या वयोवृद्ध पुरूषांनीं आपल्या प्रतिज्ञेचें उल्लंघन करावें व सत्पक्ष सोडून प्रतिपक्षास फितुराप्रमाणें सामिल होऊन सभापत्र व पंचमंडळी यांच्या नाशास प्रवृत्त व्हावें हें किती निंद्य होय!! प्रतिपक्षांतील लोक तरी ह्या फितुरीबद्दल नारायणजीस बरें ह्मणतात काय? नारायणजींचा राजिनामा पंचमंडळीनें मोठ्या खुषीनें कबूल केला.

ही मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं सन १८७८ सालांत आपल्या ज्ञातींतील पुष्कळ योग्य मनुष्यें मरण पावलीं. ह्या मरणारांत पंचमंडळीच्या सभासदांपैकीं रा. भास्कर दामोदर सारंगधर व रावसाहेब हरिशंकर मोरोबा पतंगे हे होते. भास्करराव यांनीं पूर्वीं पंचमंडळीच्या कामांत पुष्कळ मेहनत केली हें सर्वांस माहित आहे. व मृत्यूचा त्यांजवर एकाएकीं घाला आल्यामुळें त्यांच्या वृद्ध आईबापांस व निराश्रित स्त्रीस अनिवार दुःख झालें आहे. त्यांच्या आकाल मृत्यूनें पंचमंडळीही दुःखित आहे.

रावसाहेब हरिशंकर मोरोबा पतंगे हेही वृद्ध आईबाप, अनाथ पत्नी, व लहान कोमल अर्भकें यांस मागें ठेऊन तारूण्याच्या पूर्ण भरांत व उमेदींत नाहींसे झाले. हा अकल्पित दुःखाचा उद्गार ह्या स्थलीं लिहिणें आमच्या कपाळीं आलें आहे. आज पांच वर्षांपूर्वीं या गृहस्थास ज्ञातींतील थोडेच लोक ओळखत असतील. यांचा इतका भिडस्त व लाजाळू स्वभाव असे कीं आपली नौकरी, आपलें घर व आपला विद्याभ्यास यांस सोडून ते कधींही कोठें गेल्याचें आमच्या पहाण्यांत व ऐकिवांत नाहीं. यांस मराठी व इंग्रजी भाषेचें चांगलें ज्ञान होतें. तसेंच यांस गुजराथी, मोडी, व मारवाडीही येत असे. यांस लाघवी लिपीही चांगली अवगत होती. मागल्या पांच वर्षांत यांनीं कानू विषयाचा उत्कृष्ट अभ्यास करून हैकोर्टाच्या वकीलीची परीक्षा दिली. नंतर पूर्वींची सरकार नौकरी सोडून त्यांनीं कांहीं दिवस वकिलीचा धंदा चालविला. इतक्यांत भिवंडीच्या मुनसफ कोर्टांत त्यांस न्यायाधीश नेमिलें. जीर्णज्वरानें व्यथित असतां रावसाहेबांनीं तेथें कांहीं दिवस काम चालविलें. नंतर नामदार गिब्स साहेबांच्या शिफारशीवरून तेथून त्यांची नेमणूक वेंगुर्ल्यास झाली; तेथें २, ३, महिने राहून रोग दुणावल्यामुळें त्यांस मुंबईंत परत येणें भाग पडलें. मरणापूर्वीं एक वर्ष ते क्षयाच्या व्यथेनें फार जर्जर झाले होते व त्याच रोगानें शेवटीं त्यांचा घात केला. मूळची तीव्र बुद्धी आणि त्यांत विद्याव्यासंग ह्यांमुळें अल्प वयांत त्यांचे विचार प्रौढ झाले होते. कोणाबरोबर ते भाषण करूं लागले असतां त्यांच्या भाषणांत ग्रहण करण्यासारखा कांहीं तरी गुण सांपडे. पंचमंडळीच्या कामास त्यांनीं आपल्या बुद्धिबळानें बरेंच साह्य केलें. सभापत्र व नियम हीं करतेवेळीं त्यांनीं त्यांत कियेक उपयुक्त सूचना केल्या. पंचमंडळीच्या सभेंत वादविवादाच्या समयीं त्यांनीं दरएक विषयाचें उत्तम रितीनें विवेचन करावें, व ता. २९ आक्टोबर १८७७ सोमवार रोजीं झालेल्या ज्ञातीच्या सभेंत जें त्यांनीं

भाषण केलें तें अजून आह्मांस चांगलें आठवत आहे. ह्यांत त्यांनीं निस्पृहता, ज्ञातीचा कळवळा, विषयाची, व शब्दांची रचना, व बोलण्याचा अस्खलितपणा फारच चांगल्या रीतीनें दाखविला. ह्या गृहस्थांत सत्यप्रीति, विनय, व उद्योग हे गुण विशेष होते. यांच्या अकाल मरणानें त्यांच्या कुटुंबास तर अनिवार्य दुःख झालेंच आहे. परंतु त्यांचे आप्त, व मित्र, पंचमंडळीचे सभासद, व ज्ञातींतील बहुतेक लोक हळहळत आहेत. यांनीं सन १८७८ नवेंबर ता. १२ रोजीं मुंबईंत आपल्या कुटुंबांत, आपले सोईरे व स्नेही यांनीं वेष्टित, देह ठेविला. त्याच महिन्याच्या १६ व्या तारखेस पंचमंडळीची सभा भरली होती तेवेळीं रावसाहेबांच्या मरणाविषयीं जे ठराव झाले ते येणेंप्रमाणें:—

मुंबई, ता. १७ माहे नोवेंबर सन १८७८.

**रा. रा. मोरोबा सदाशिव शेट पतंगे यांस,**

महाराज,

काल रोजीं सायंकाळीं माझ्या येथें पंच मंडळीची सभा भरली होती, ते समयीं प्रथमतः अध्यक्ष रा. पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने ह्यांच्या सूचनेवरून आपले ज्येष्ठ पुत्र मयत रावसाहेब हरिशंकर मोरोबा पतंगे यांच्या अकाल मृत्यूविषयीं कालच्या मुंबई ग्याझेट पत्रांत आलेला दुःखद समाचार मंडळीस वाचून दाखविला. नंतर मंडळीनें एकचित्त होऊन दु.ख प्रदर्शक दोन ठराव केले, ज्यांच्या नकला मंडळीच्या हुकूमावरून ह्या पत्रा समवेत आपणास पाठल्या आहेत; ते ठराव आपण वाचून आपल्या कुटुंबांतील सर्व मनुष्यांस वाचून दाखवावे.

आपला सेवक,

**शिवशंकर मलोजी चवाथे,**

चिटणीस.

## ठराव १ ला.

रावसाहेब हरिशंकर मोरोबा पतंगे यांस ता. १२ माहे नोवेंबर सन १८७८ मंगळवार रोजीं देवाज्ञा झाली. त्यांच्या अकाल मृत्यूमुळें पंचमंडळी फार दिलगीर आहे. आरंभापासून ते पंचमंडळीचे सभासद होते, व त्यांनीं मंडळीच्या दृढीकरणार्थ व उत्कर्षार्थ जे अमूल्य परिश्रम केले तेणेंकरून त्यांचे पंचमंडळीवर, व जातीवर पुष्कळ उपकार झाले. त्यांचे पोक्त व थोर विचार, व ते निस्पृहपणें सभेस प्रदर्शित करण्याची त्यांची शैली, त्यांचा सुस्वभाव, व सत्यप्रीति, हीं पाहून मंडळीस आनंद होत असे. पंचमंडळीस तर काय, पण ज्ञातीस रावसाहेब भूषण होते. अशा ह्या गुणवान् पुरुषास मृत्यूनें अकालीं गांठलें हें शिंपी ज्ञातीचें दुर्दैव. जगन्नियंत्या प्रभूनें त्यांच्या मागें त्यांच्या कुटुंबास सुरक्षित ठेवावें अशी या मंडळीची त्या प्रभूकडे प्रार्थना आहे.

## ठराव २ रा.

पंचमंडळीचे सभासद रावसाहेब हरिशंकर मोरोबा पतंगे यांच्या मृत्यूविषयींचा सदरील दुःख प्रदर्शक ठराव मंडळीच्या दप्तरीं नोंदावा, व तूर्त त्या ठरावाची नक्कल त्यांचे तीर्थरूप

रा. मोरोबा सदाशिव शेट पतंगे यांस पाठवावी. व पंचमंडळीच्या निघणाऱ्या रपोर्टांत तो छापून प्रसिद्ध करावा.

रावसाहेबांच्या मरणाविषयीं मुंबई ग्याझेटींत आलेला मजकूर येणेंप्रमाणें:—

We learn that the Subordinate Judge of Vingorla, Rao Sahib Harishunker Moroba Patangay, has just died in Bombay, in the 29th year of his age, after an illness from consumption of about ten months. We are informed that he rose from being a clerk in the Post Office, and with physical and pecuniary disadvantages he raised himself by dint of perseverance to the position of a Judge. The Shimpee community, to which he belonged, have lost in him a warm and sincere friend to the cause of reform. Bombay Gazette 16th November 1878.

---

"सत्यशोधका" चे प्रसिद्ध कर्ते रा. जगन्नाथ अंतोबा दिघे यांनीं तूर्त नेमिलेल्या
मंडळीची छापून प्रसिद्ध झालेली हकीकत समग्र लक्षपूर्वक वाचून, व सन १८७७ जुलै
ता. २९ रोजीं झालेल्या आबालवृद्धांच्या सभेंत चिटणीसानें समापत्र साद्यंत वाचून दाखविलेलें
लक्षपूर्वक ऐकून त्यावर मोठ्या आनंदानें सही केली; असें असून लोकांस भलत्याच समजुती
घालून अलीकडेस समापत्राचा नाश व पंचमंडळींचा मोड करण्यास ते झटत आहेत; ह्मणून
त्यांच्याविषयीं लोकांनीं सावध असावें. याजविषयीं आह्मी मागें एक प्रसिद्धी पत्र काढलेंच
होतें, ह्मणून त्याविषयीं येथें अधिक लिहिणें नको.

पंच मंडळीच्या ज्या सर्व सभा झाल्या त्यांत न्याय प्रकरणीं, नियमांच्या १९ व्या प्रकरणास अनुसरून एकंदर तीन सभा झाल्या.

पंच मंडळीच्या दोन सभा ८४ व्या नियमाप्रमाणें ज्ञातींतील गांधर्व विवाहाच्या संबंधानें झाल्या.

मध्यंतरीं पंच मंडळीपुढें दुसऱ्या कांहीं किरकोळ फिर्यादी आल्या होत्या, परंतु त्यांचा निकाल ९० व ९१ व्या नियमांप्रमाणें झाला.

समापत्रावर आह्मी करूं तो शेरा करूं दिल्यावांचून आम्ही समापत्रावर सह्या करणार
नाहींत, ह्या थोतांडाचा निकाल झाल्या नंतर प्रतिपक्षानें दुसरें थोतांड उपस्थित केलें; तें
असें कीं जितके पंचमंडळींचे सभासद आहेत तितकेच आमच्यांतून पंचमंडळींत घ्या;
( ह्मणजे प्रतिपक्षाच्या ह्मणण्याप्रमाणें ४० तुमचे व ४० आमचे ) ह्मणजे आम्ही समेट
करितों; परंतु त्या चाळीसांत, किंवा हल्लीं असणाऱ्या २९ सभासदांत चौघे मानकरी गणले
जाऊं नयेत. काय लपंडाव हे ! प्रतिपक्षास पक्कें माहीत आहे कीं, सर्व पदच्युत मानकरी
त्यांच्या पक्षाकडले आहेत. व ३९ व्या नियमाप्रमाणें प्रत्येक मानकऱ्याचें मत द्विगुणीत
गणलें जाईल. ह्या खऱ्या हिशोबानें समेटीकरितां प्रतिपक्षाचें ह्मणणें कबूल केल्यास त्यांची
संख्या पंच मंडळीच्या सभासदांपेक्षां जास्त होईल हें सांगणें नकोच; व हा जो तर्क प्रति-
पक्षानें काढला आहे तो कापट्यभावानें काढला आहे हें कोणीही सांगेल.

बडोद्यास राहाणारे आपले ज्ञातिबंधू रा. हरि नारायण सोमने हे परपेठेंत राहाणारे
असून त्यांनीं मोठ्या आनंदानें समापत्रावर सही केली हें पाहून पंचमंडळीस संतोष झाला.

पंचमंडळीचे सभासद व ज्ञात्याभिमानी इतर गृहस्थ यांनीं आरंभापासून आजदिनें पर्यंत जी वर्गणी जमविली, तिचा खर्च ज्याकरितां केला तीं कारणें येणेंप्रमाणें:—

१ फाल्गुनोत्साह; २ वृत्तांत व प्रसिद्धी पत्रें इत्यादि यांची छापणावळ; ३ नोटिशी इत्यादि करितां वकीलाचा खर्च; ४ पंचमंडळीच्या व ज्ञातीच्या सभा भरण्याचा खर्च; व ५ पंचमंडळीचे दप्तराचा खर्च.

पंच मंचळीच्या सभासदांपैकीं मासीक वर्गणी देणारांकडून ती गोळा करणें, तसेंच फाल्गुनोत्साह प्रित्यर्थ ज्ञातींतील इतर गृहस्थांनीं दिलेली जमविणें व तिचा आणि तिच्या खर्चाचा हिशोब ठेवणें हें काम पंच मंडळीचे सभासद रा. केशव पुतळाजी चवाथे यांनीं पत्करून तें आज सुमारें दोन वर्षें उत्तम रीतीनें चालवीत आहेत. हा श्रमविभाग त्यांनीं घेतल्यामुळें पंच मंडळी त्यांची आभारी आहे.

समापत्र व नियम करून पंचमंडळीचें कर्तव्य आटोपलें असें नाहीं. परंतु कोणत्याही इमारतीचा पाया घातल्यावांचून इमारत बांधतां येत नाहीं हें निर्विवाद आहे. ज्ञातींत व्यवस्था व सुधारणा यांची इमारत बांधण्यास त्या कामास अनुकूळ असा पहिल्यानें समुदाय जमविला पाहिजे; व समुदायाचें वर्तन अमुक रितीनें चाललें असतां सर्वांस हितावह होईल ह्मणून पंचमंडळीनें होणाऱ्या सुधारणेच्या इमारतीस समापत्र व नियम यांचा पाया घातला आहे. ह्या पायाच्या बळकटीविषयीं आपल्या ज्ञातींतील लोकांनीं तर काय, पण परक्या ज्ञातींतील लोकांनीं देखील अनुकूळ अभिप्राय प्रदर्शित केले आहेत. पाया घालून इमारत बांधीत आहों, तों प्रतिपक्षांतील लोक लपून छपून, व फावल्यास उघडपणें, कोणी त्या इमारतीचे बहाल, कोणी इमारतीचे खांब, कोणी भिंत, कोणी पहिल्या मजल्याची तक्तपोशी, कोणी जिना, कोणी वाऱ्या अशीं काढून नेत आहेत; व कोणी त्या इमारतीवर दुरून दगड फेंकीत आहेत; व पुन्हा फुशारकीनें ह्मणत आहेत कीं आज दोन वर्षांत पंचमंडळीनें कोणकोणतीं ज्ञातिकल्याणाचीं कामें केलीं? निरनिराळे कागद करून असमंजस लोकांस खोट्या समजुती देवून, व त्याकरितां वारंवार कोनाकोपऱ्यांत आपल्याच मंडळीच्या "पंचायती" करून समापत्रांतील सह्या रद्द करण्यास लोकांस प्रवृत्त करणें, आणि पुन्हा पंचमंडळीनें दोन वर्षांत काय केलें हें ह्मणणें किती निंद्य होय! अशा ह्या विघ्नसंतोषी व अनुपकारी लोकांच्या मनांत ईश्वरानें सुप्रेरणा केल्यावांचून पंचमंडळीचा सार्वजनिक हेतू लवकर सिद्धीस जाईलसा दिसत नाहीं. परंतु कालांतरानें त्यांचे प्रयत्न सफल होतील याविषयीं संदेह नाहीं. ईश्वर कृपेनें एकिकरण लवकर झाल्यास पंचमंडळीच्या मनांतून पहिल्यानें ज्ञातीच्या हल्लींच्या स्थितीच्या खऱ्या स्वरूपाचें शोधन करणें आहे. मोडकळीस आलेला ज्ञातींतील बहुतेकांचा शिवणधंदा सुधारणें हा दुसरा हेतु आहे. तिसरा उद्देश चरितार्थ मिळविण्यास साह्य करणाऱ्या, व नीति वृद्धिंगत करणाऱ्या विद्यांचा ज्ञातींत प्रसार करणें हा आहे. ज्ञातींत सर्वांचें ऐक्य होऊन पंचमंडळीचे स्तुत्य हेतू सिद्धीस जावे ह्मणून ती मंडळी जगताचा जो प्रभू त्याजवळ लीन होऊन त्याची करुणा भाकित आहे.

**शिवशंकर मलोजी चवाथे,—चिटणीस.**

# पंचमंडळीस ता० १२ वी आगष्ट सन १८७७ पासून तों ता० १५ मे १८८० पर्यंत आलेल्या टिळ्या विड्यांची याद.

## सन १८७७ सालांत.

आगष्ट ता. १२—पांडोबा कृष्णाजी सुरांजण यांचा मुलगा ( शिवराम ) याचे सोहळ्याचा विडा.... १-८-०
आगष्ट ता. १२—गणपत नथूजी चवाथे यांच्या येथें नानाभाई विश्वनाथ सदावर्ते यांजकडून अहेराबद्दल ०-८-०
नोवेंबर ता. ११—लक्षुमण जगन्नाथजी भोजने यांचा वडील मुलगा (परशुराम) याचे सोहळ्याचा विडा. १-८-०
नोवेंबर ता. ३०—नारायण भास्करजी बदले यांचे सोहळ्याचा विडा... ............ १-०-०
नोवेंबर ता. ३०—त्रिंबक नथुजी घेवडे यांजकडून अहेराबद्दल...... ............ ०-८-०

१-८-०

डिसेंबर ता. ५—शामराव नारायणजी सोमने यांचा मुलगा व सदाशिव बंभुजी चवाथे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० ३ व वधूकडून रु० ३.......................... ६-०-०
डिसेंबर ता. ५—आनंता राघोबा भुतकर यांचा मुलगा व शामराव नारायणजी सोमने यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० १.............................. ३-०-०
डिसेंबर ता. ५—भाऊ हरिश्चंद्रजी निरगुडे यांचा मुलगा व गोपिनाथ आत्मारामजी दिघे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा वराकडून मात्र आला.......................................... ६-०-०
डिसेंबर ता. ७—दामोदर पुरूषोत्तमजी नाळेकर यांचा मुलगा व भाऊ हरिश्चंद्रजी निरगुडे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० ५ व वधूकडून रु० २......................... ७-०-०

## सन १८७८ सालांत.

जानुआरी ता. २०—चिमाजी झिंगुरजी संत यांचे सोहळ्याचा विडा.................. १-०-०
जानुआरी ता. २०—पांडुरंग लक्षुमणजी भोजने यांजकडून अहेराबद्दल............. ०-८-०

१-८-०

फेब्रुआरी ता. ३—शामराव लक्षुमणजी निळकंठ व बाळकृष्ण लक्षुमण गोरे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० ४ व वधूकडून रु० १............................ ५-०-०
फेब्रुआरी ता. ७—मोरोबा सदोबा पतंगे यांचा मुलगा (बाळकृष्ण) व राघोबा पांडुरंग सोमने यांची मु॰गी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० १॥............ ३-८-०
फेब्रुआरी ता. ७—नारायण नागोबा ठाणेंकर व राघोबा पांडुरंग सोमने यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० ४ व वधूकडून रु० १॥.............................. ५-८-०
फेब्रुआरी ता. २२—वासुदेव बाळाजी सुरांजण यांचा धाकटा मुलगा व रामकृष्ण लक्षुमणजी डोळस यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वधूकडून मात्र आला.......................... ६-८-०
फेब्रुआरी ता. २२—बाळकृष्ण फकीरजी टकले यांचा मुलगा व नारायण तुळाजी भुरू यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून मात्र आला.............................. १-०-०
मार्च ता. १७—शिवराम धोंडशेट नाळेकर व नागोबा सखाराम पुणेंकर यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० ॥.............................. १-८-०
मार्च ता. १८—हरि विठोबा वारके यांचा मुलगा व भाचा व राघोबा अंतोबा मेंगळे यांच्या दोघी मुली यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व उभय वधूकडून रु० २................ ४-०-०
मार्च ता. २०—लक्षुमण भास्करजी बरवे व हरिश्चंद्र विठोबा पतंगे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० ।.................................. १-४-०
मार्च ता. २०—रामचंद्र अंतोबा मेंगळे यांचा मुलगा व नारायण नथुजी घेवडे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० २.............................. ४-०-०
मार्च ता. २०—उपाध्याय गणपत गोपाळ भट्ट यांनीं लग्नपत्रिकेंच जमविलेले........................ ०-५-०
मार्च ता. २०—भाई पुतळाजी खडे यांचे सोहळ्याचा विडा.................................. १-०-०

६

एप्रिल ता. २०—सदाशिव बंधुजी चवाथे याचे सोहळ्याचा विडा ............... १-८-०
नारायण रतनशेट ढगे यांजकडून अहेराबद्दल ..................... ०-८-०
——— २-०-०

मे ता. ३—पांडुरंग चिमाजी मेंगळे व माधवशेट मुकुंदशेट रोडे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० २.............................................. ४-०-०

मे ता. १९—भास्कर सखारामजी किरावंत व हिराजी अंतोबा निरगुडे यांची मुलगी यांच्या सोयरिकीचा विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० १ .............................................. २-०-०

जून ता० २—नारायण विठोबा बदले यांचे सोहळ्याचा विडा............................ १-०-०
दामोधर पुतळाजी चवाथे यांजकडून अहेराबद्दल.............................. ०-८-०
——— १-८-०

जुलै ता. १९—केशव चंदुजी गुजर यांचे सोहळ्याचा विडा ............................ १-८-०
रामचंद्र भगवान शेट गोरे यांजकडून अहेराबद्दल ............................ ०-८-०
——— २-०-०

जुलै ता. १९—शिवराम पांडुरंग मुराजण यांच्या येथें गोपाळ सदोबा पतंगे यांजकडून अहेराबद्दल रु० ॥॰ व पांडोबा विठोबा गद्रे यांजकडून रु० ॥॰.............................................. १-०-०

अक्टोबर ता. २०—पांडुरंग लक्ष्मणजी भोजने यांचा वडील मुलगा (वासुदेव) यांच्या सोहळ्याचा विडा.............................................. १-८-०
बळीराम दादाजी सारंगधर यांजकडून अहेराबद्दल.............................. ०-८-०
——— २-०-०

नोवेंबर ता. ३—विश्वनाथ पांडोबा चवाथे यांचे धाकटे मुलाचे सोहळ्या निमित मुलीची आई वेणुबाई इजकडून अहेराबद्दल.............................................. ०-८-०

नोवेंबर ता.२१—पुरुषोत्तम धर्मोजी किरावंत यांचा मुलगा (पांडुरंग) यांचे सोहळ्याचा विडा. १-८-०
वासी दामोधर धवासंक (ठाणेकर) यांजकडून अहेराबद्दल.......... ०-८-०
——— २-०-०

नोवेंबर ता. २२—नानाभाई बंधुजी दिघे यांचे सोहळ्याचा विडा.............................. १-०-०
चिमाजी भास्करजी चवाथे (उरणकर) यांजकडून अहेराबद्दल ....... ०-८-०
——— २-०-०

डिसेंबर ता. १५—केशव पुतळाजी चवाथे यांच्या गांधर्व विवाहबद्दल विडा.............................. ५-०-०

## सन १८७९ सालांत.

मार्च ता. २—कृष्णराव हरिशंकर गोरे व शिवशंकर मलोजी चवाथे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० ३ व वधूकडून रु० २.............................................. ५-०-०

मार्च ता. १९—बाळकृष्ण चिंतोबा कारडे यांजकडून त्यांच्या मुलीस अहेराबद्दल.............. ०-८-०

एप्रिल ता. १८—रघुनाथ पांडवजी नाईक यांच्या मुलाच्या सोहळ्याचा विडा.............. १-०-०

एप्रिल ता. २४—मुकुंदा बाबाजी ढोलस व मोरोबा मुकुंदजी बरवे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० १.............................................. २-०-०

एप्रिल ता. २७—लक्ष्मण जगन्नाथजी भोजने यांचा धाकटा मुलगा व दामोधर भास्करजी ढगे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० १.............................. ३-०-०

एप्रिल ता. २७—मोरोबा सदोबा पतंगे यांचा मुलगा व दामोधर भास्करजी ढगे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० १.............................. ३-०-०

एप्रिल ता. २७—मोरोबा सदोबा पतंगे यांचा नातू (मयत हिरामण नथूजी घेवडे यांचा मुलगा) व लक्ष्मण सखाराम गद्रे (चेऊलकर) यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० १.............................................. ३-०-०

एप्रिल ता. २७—महादेव पांडुरंगजी घेवडे यांचा धाकटा बंधू व बाळोबा कोंडाजी खोले यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० २.............................. ४-०-०

एप्रिल ता. २८—केशव पुतळाजी चवाथे यांचे सोहळ्याचा विडा.............. १-८-०
मे ता. ४—भिकाजी भाई शेट खंडेकर व बाळकृष्ण लक्षुमणजी अवासंक यांची मुलगी याच्या सोयरीकीचा
विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० १.............. २-०-०
मे ता. ५—बाळकृष्ण चिंतोबा कोरडे व चिमणाजी पुणेकर यांची मुलगी याच्या सोयरीकीचा विडा,
वराकडून रु० १ व वधूकडून रु० १.............. २-०-०
मे ता. १५—उपाध्याय गणपत गोपाळ भट्ट याजकडून लग्नपत्रिकेचे जमविलेले.............. २-३-०
जून ता. २३—भाई जीवबा शेट बरवे याच्या गांधर्व विवाहबद्दल विडा.............. ५-०-०
डिसेंबर ता. २७—पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने यांची नात ( बाळाजी जनार्दन हंबीर याची मुलगी )
व बाळकृष्ण बाळाजी गोरे यांचा मुलगा यांच्या सोयरीकीचा विडा, वधूकडून मात्र आला...... ६-८-०

## सन १८८० सालांत.

जानुआरी ता. ३—शिवराम पांडुरंग मुरांजण यांचा धाकटा बंधू (रामकृष्ण) व चिमाजी भास्करजी
चवाथे ( उरणकर ) यांची नात याच्या सोयरीकीचा विडा, वराकडून मात्र आला.............. १-०-०
जानुआरी ता. ८—रामचंद्र भगवान शेट गोरे याजकडून वासुदेव एकनाथ केळवे माहिमकर यांस
अहेराबद्दल.............. ०-८-०
फेब्रुआरी ता. १२—विठोबा जगन्नाथ भोजने यांचे सोहळ्याचा विडा.............. १-०-०
फेब्रुवारी ता. १५—बाळकृष्णभाई ढगे यांचा धाकटा भाऊ व पांडुरंग रघुनाथ गुरजर
यांची बहीण याच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० २ व वधूकडून रु० ॥ ... २-८-०
फेब्रुवारी ता. १५—विठोबा त्रिंबक माडीक यांचा मुलगा व पांडुरंग रघुनाथ गुजर यांची बहीण
याच्या सोयरीकीचा विडा, वराकडून रु० १ व वधूकडून रु० ॥ .............. १-८-०
४-०-०

फेब्रुवारी ता. २७—रामचंद्र झिपुर संत, व नारायण चेऊलकर यांची मुलगी याच्या सोयरीकीचा
विडा, वराकडून.............. १-०-०
मार्च ता. २१—पांडुरंग लक्षुमण पतंगे यांच्या सोहळ्याचा विडा.............. १-०-०
मे ता. २—मुकुंदा लक्षमण घोसाळकर यांचा मुलगा व केशव पुतळाजी चवाथे यांची मुलगी याच्या
सोयरिकीचा विडा वराकडून रु० ३, व वधूकडून रु० २ .............. ५-०-०
मे ता. २—लक्षुमण धोंडशेट घोसाळकर यांची मुलगी व भाई शेट पनवेलकर यांचा
मुलगा याच्या सोयरीकीचा विडा, वधूकडून मात्र आला .............. २-०-०
७-०-०

मे ता. १५—शिवराम सजन नाईक यांचा भाऊ व नारायण पुरुषोत्तम मेंगळे यांची मुलगी यांच्या
सोयरीकीचा विडा, वराकडन रु० २ व वधूकडून रु० १ .............. ३-०-०
मे. ता. १५—रामचंद्र भगवानशेट गोरे यांचा भाचा ( मुकुंदा केरोजी सारंगधर यांचा
मुलगा) व नारायण पुरुषोत्तम मेंगळे यांची मुलगी यांच्या सोयरीकीचा विडा, वराकडून
रु० २ वधूकडून रु० १ .............. ३-०-०
६-०-०

एकंदर रुपये... १४८-४-०

---

## पंचमंडळीच्या हल्लीं असणाऱ्या सभासदांचीं नांवें.

रा० मोरोबा सदाशिव शेट पतंगे.
,, पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने ( ज्ञातिफंडाचे ट्रस्टी ).
,, बाळकृष्ण हरिश्चंद्रजी भोजने.
रा० नारायण सखाराम सदावर्त.
,, मोरोबा मुकुंदजी बर्वे.
,, गोपिनाथ दादाजी सारंगधर.
,, गोपाळ सदाशिव पतंगे.

रा० भाऊ हरिश्चंद्र निरगुढे.
,, जगन्नाथ अंतोबा निरगुढे.
,, शिवशंकरभाई सासवडकर.
,, सदाशिव बंधु चवाथे.
,, नानाभाऊ केदारे.
,, महादेव हिराजी शहाणे.
,, रघुनाथ रामचंद्र ढगे.
,, लक्ष्मण पुरुषोत्तम किरावंत.
,, अनंता वासुदेव नाईक.
,, लक्ष्मण भाऊ केदारे.
,, विश्वनाथ लक्ष्मणजी निळकंठ.
,, नारायण भिकाजी ढगे.

रा० दिनानाथ भाई बर्वे.
,, काशिनाथ बाळाजी मुरांजण.
,, मुकुंदा लक्ष्मण घोसाळकर.
,, जनार्दन धाकजी भोजने.
,, केशव पुतळाजी चवाथे.
,, रामकृष्ण लक्ष्मणजी डोळस.
,, केशव चंदु गुजर.
,, बंधु सखाराम घेवडे.
,, नारायण पुरुषोत्तम मेंगळे.
,, शिवशंकर मलोजी चवाथे (पंचमंडळीचे चिटणीस).

---

## समापत्रावर सह्या केलेल्यांचीं वर्णवार नांवें.

### अ.

रा. अनंता वासुदेव नाईक.
,, अनंता लक्ष्मण पतंगे.
,, अनंता बाळाजी बदले.
,, अनंता मुकुंदजी बरवे.
,, अनंता धर्माजी किरावंत.
,, आत्माराम रामचंद्रजी बरवे.
,, आत्माराम चिमाजी मेंगळे.
,, आत्माराम लक्ष्मण घोसाळकर.
,, आत्माराम बाळाजी खेडेकर.

### क.

रा. काशिनाथ बाळाजी सुरांजण.
,, काशिनाथ कृष्णाजी बदले.
,, काशिनाथजी विश्वनाथजी ढगे.
,, काशिनाथ आत्मारामजी मेंगळे.
,, केशव राघोबा मेंगळे.
,, केशव पुतळाजी चवाथे.
,, केशव चंदु गुजर.
,, केशव मोरोबा भोजने.
,, केशव भाई सदावर्ते.
,, केशव नरसुजी गाठे.
,, केशव नथूजी निरगुढे.
,, केशव जगन्नाथ खेडेकर.
,,

### कृ.

रा. कृष्णाजी नारायण ढगे.
,, कृष्णा बंधु चवाथे.
,, कृष्णा मोरोबा भोजने.
,, कृष्णा पुतळाजी किरावंत.
,, कृष्णा सखाराम बदले.
,, कृष्णा जगन्नाथ हावडे.
,, कृष्णाजी गोविंद ढमे.
,, कृष्णाजी सखाराम दिघे.

### ग.

रा. गणपत अंतोबा निरगुढे.
,, गणपत नथुजी चवाथे.
,, गणपत बाळकृष्णजी सदावर्ते.
,, गणपतराव वासुदेवजी गोरे.
,, गणपत विठोबा टकले.
,, गणोबा मुकुंदजी शेट नाईक.
,, गोपाळ नरसुजी गाठे.
,, गोपाळ सदोबा पतंगे.
,, गोपिनाथ दादाजी सारंगधर.
,, गोपिनाथ आत्माराम बरवे.
,, गोविंद बाळकृष्ण खेडे.
,, गोविंद पांडुरंग चंदन.
,, गोरोबा सदाशिवजी धुरू.

### च.

रा. चंदु भिकाजी धुरू.
,, चिंतामण कृष्णाजी चंदन.
,, चिमणाजी कृष्णाजी वारके.
,, चिमाजी नारायण ढगे.
,, चिमाजी झीपुर संत.

### ज.

रा. जगन्नाथ अंतोबा निरगुढे.
,, जगन्नाथ फकीरजी टकले.
,, जगन्नाथ अंतोबा दिघे.
,, जगन्नाथ बाळाजी खेडेकर.
,, जगु केसोबा सदावर्ते.
,, जनार्दन धाकजी भोजने.
,, जनार्दन झिपुर संत.
,, जनार्दन नथुजी निरगुढे.
,, जनार्दन बंधु किरावंत.
,, जनार्दन कृष्णाजी वारके.
,, जयराम भिकाजी बदले.
,, जयरामजी बापुजी डोळस.
,, जिवनजी पांडवजी धुरू.
,, जुगोबा सदाशिवजी धुरू.

### त.

रा. तुळाजी पांडोबा नाईक.

**त्र.**

रा. त्रिंबक नथुजी घेवडे.
,, त्रिंबक नारायणजी चवाथे.
,, त्रिंबक दामोधर भोजने.

**द.**

रा. दामोधर पांडुरंग मुरांजण.
,, दामोधर भास्करजी ढगे.
,, दामोधर रामशेट नाईक,
,, दामोधर पुतळाजी चवाथे.
,, दिनानाथ भाई बरवे.
,, दिनानाथ काशिनाथजी चवाथे.
,, दिनानाथ बाळाजी दिघे.
,, दिनाजी सदाशिवजी खेडेकर.
,, दिनानाथ राघोबा भुतकर.

**न.**

रा. नथु दुंदाजी खांबेकर.
,, नथुराम भाई चवाथे.
,, नथु जयराम दिघे.
,, नथुराम सदोबा संत.
,, नथु शिवबा गुजर.
,, नथुशेट केशवजी निरगुडे.
,, नथुराम बाबाजी चवाथे.
,, नरसु महादेवजी नाईक.
,, नानाभाई विश्वनाथजी सदावर्त.
,, नानाभाई बंदुजी दिघे.
,, नानाभाई सदाशिव दिघे.
,, नानाभाई काशिनाथ नाईक.
,, नाना भाऊ केदारे.
,, नानाभाई अनंताजी भोजने.
,, नाना जयरामजी दिघे.
,, नाना नथुजी निरगुढे.
,, नानाभाई हरिश्चंद्र बदले.
,, नारायण तुळाजी धुरू.
,, नारायण भास्करजी बावडे.
,, नारायण जगन्नाथ दिघे.
,, नारायण अंतोबा मेंगळे.
,, नारायण भिकाजी ढगे.
,, नारायण सखाराम सदावर्त.
,, नारायण दिनानाथ चवाथे.
,, नारायण मुकुंदजी दिघे.
,, नारायण बाळाजी खेडेकर.
,, नारायण पुरषोत्तमजी मेंगळे.
,, नारायण केरोबा सदावर्त.
,, नारायण मोरोबा पतंगे.
,, नारायण विठोबा बदले.

रा. नारायण रघुनाथजी ढगे.
,, नारायण मुकुंदजी बरवे.
,, नारायण सजणशेट गुजर.
,, नारायण नरसुजी गाठे.
,, नारायण चिमाजी नाईक.
,, नारायण भाई सासवडकर.
,, नारायण रामचंद्रजी भोजने.
,, निंबाजी दादबा अवसरकर.

**प.**

रा. परशुराम हिराजी शहाणे.
,, परशुराम लक्ष्मण भोजने.
,, परशुराम विश्वनाथ ढगे.
,, परशुराम सखाराम डोळस.
,, पांडुरंग हरिश्चंद्रजी भोजने.
,, पांडुरंग लक्ष्मणजी भोजने.
,, पांडुरंग हरिबाजी संत.
,, पांडुरंग सखाराम राऊत.
,, पांडुरंग बाळकृष्ण गोरे.
,, पांडुरंग मुकुंदजी दिघे.
,, पांडुरंग चिमाजी मेंगळे.
,, पांडुरंग पुरषोत्तम किरावंत.
,, पांडुरंग सखाराम सदावर्ते.
,, पांडुरंग विठोबा गंभ्रे.
,, पांडुरंग रघुनाथ गुजर.
,, पांडोबा कृष्णाजी मुरांजण.
,, पुतळाजी जयरामजी शेट खों-
बेकर.
,, पुरुषोत्तम धर्माजी किरावंत.
,, पुरूषोत्तम तुळाजी संत.

**ब.**

रा. बंधु रघुनाथ वैद्य.
,, बंदु भाऊ शेट भुतकर.
,, बंधु रघुनाथजी किरावंत.
,, बंधु सखाराम घेवडे.
,, बसंता दामोधर भोजने.
,, बळिराम दादाजी सारंगधर.
,, बाबाजी जनार्दन गोरे.
,, बापुजी जयराम डोळस.
,, बाबाजी माधवशेट चवाथे.
,, बाबुल मुकुंदजी शेट दिघे.
,, बाळकृष्ण हरिश्चंद्रजी भोजने.
,, बाळकृष्ण भाई ढगे.
,, बाळकृष्ण विठोबा बदले.
,, बाळकृष्ण मोरोबा पतंगे.
,, बाळकृष्ण चिंतोबा कोर्डे.

रा. बाळकृष्ण नथुजी घेवडे.
,, बाळकृष्ण रामचंद्रजी बरवे.
,, बाळकृष्ण बाळाजी ढगे.
,, बाळकृष्ण केरोबा सदावर्ते.
,, बाळकृष्ण लक्ष्मणजी आवासंक.
,, बाळकृष्ण रघुनाथ ढगे.
,, बाळकृष्ण फकीरजी टकले.
,, बाळकृष्ण विश्वनाथ सारंगधर.
,, बाळाजी जनार्दन हंबीर.
,, बाळाजी कोंडाजी शेट खोले.
,, बाळाजी विठोबा शहाणे.
,, बाळोबा भिकाजी नाईक.
,, बाळोबा धोंडबा गुजर.

**भ.**

रा. भवानी दामोदर भोजने.
,, भाई हरिश्चंद्र पतंगे.
,, भाई पुतळाजी खरडे.
,, भाई केरोजी नाईक.
,, भाऊ हरिश्चंद्रजी निरगुडे.
,, भास्कर दामोधरजी सारंगधर.
,, भास्कर जगन्नाथ शेट ढगे.
,, भास्कर बाळाजी दागावकर.
,, भास्कर सखाराम किरावंत.
,, भिकाजी रघुनाथ बदले.
,, भिकाजी सखाराम नाईक.
,, भिकाजी वासुदेव शेट पतंगे.

**म.**

रा. मनाजी सखाराम बदले.
,, महादेव पांडुरंगजी घेवडे.
,, मधुसूदन भास्कर ढगे.
,, महादेव चंदूजी खरडे.
,, महादेव शेट मुकुंद शेट रिंडे.
,, महादेव विठोबा चंदन.
,, मल्हारी सखाराम शहाणे.
,, माणिक सखाराम घेवडे.
,, माणिकचंद सखारामशेट करवे.
,, माधव बाळकृष्ण बदले.
,, महादेव हिराजी शहाणे.
,, मुकुंदजी सदाशिवजी गाठे.
,, मुकुंदा त्रिंबक मार्डीक.
,, मुकुंदा बंधु केदारे.
,, मुकुंदा पुरूषोत्तम किरावंत.
,, मुकुंदराव चिमाजी शेट मेंगळे.
,, मुकुंदजी भाईजी ढगे.
,, मुकुंदा विश्वनाथ गोरे.

रा. मुकुंदा लक्षुमण निरगुडे.
,, मुकुंदा जगन्नाथजी शेट ढगे.
,, मुकुंदा लक्षुमण घोसाळकर.
,, मुकुंदा बाबाजी डोळस.
,, मोरोबा रामचंद्र भोजने.
,, मोरोबा मुकुंदजी बरवे.
,, मोरोबा नारायण दिघे.
,, मोरोबा सदाशिव शेट पतंगे.
,, मोरोबा नथुजी टकले.

**य.**

रा. यादव लक्षुमण भोजने.

**र.**

रा. रघुनाथ रामचंद्र ढगे.
,, रघुनाथ नामाजी ढगे.
,, रघुनाथ पांडवजी नाईक.
,, राघोबा पांडुरंगजी सोमने.
,, रामचंद्र अंतोबा मेंगळे.
,, रामचंद्र भगवानजी गोरे.
,, रामचंद्र चिमाजी मेंगळे.
,, रामचंद्र भास्कर बरवे.
,, रामकृष्ण लक्षुमणजी डोळस.
,, रामकृष्ण जगन्नाथ खेडेकर.
,, रामभाऊ भिकाजी ढगे.
,, रामचंद्र हरिबा शेट नाईक.
,, रामचंद्र महादेव गाडे.
,, रामभाऊ वासुदेव पतंगे.
,, रामचंद्र फकीरजी टकले.
,, रामचंद्र भाई ढगे.
,, रामु विठोबा माडीक.
,, रामचंद्र झिपुर संत.
,, रामकृष्ण विश्वनाथ घेवडे.

**ल.**

रा. लक्षमण भाऊ केदारे.
,, लक्षमण पुरुषोत्तमजी किरावंत.
,, लक्षुमण फकुरजी शेट ढगे.
रा. लक्षुमण भास्कर बरवे.
,, लक्षुमण जगन्नाथजी भोजने.
,, लक्षुमण रामचंद्रजी ढगे.
,, लक्षमण बाबाजी गंध्रे.
,, लक्षुमण धोंडशेट घोसाळकर.
,, लक्षुमण दामोदरजी नाईक.
,, लक्षुमणजी अंतोबा भावासंकर.

**व.**

रा. वामन बाळाजी खोले.
,, वासुदेव पांडुरंग भोजने.
,, वासुदेव जगन्नाथ खेडेकर.
,, वासुदेव केशवजी भोजने.
,, वासुदेव बाळकृष्णजी कोरडे.
,, वासुदेव पुतळाजी सदावर्ते.
,, वासुदेव धोंडबा डोळस.
,, वासुदेव सदाशिव ढगे.
,, वासुदेव बंभु भुनकर.
,, विठ्ठल राघोबा भुनकर.
,, विठोबा त्रिंबकजी माडीक.
,, विठोबा आत्माराम बदले.
,, विठोबा जगन्नाथ भोजने.
,, विठोबा गणोबा नाईक.
,, विनायक वासुदेव गोरे.
,, विश्वनाथ लक्षुमणजी निळकंठ.
,, विश्वनाथ भाऊ खेडेकर.
,, विश्वनाथ बाळाजी नाईक.

**श.**

रा. शंकर राघोबा भुनकर.
,, शामराव लक्षुमणजी भोजने.
,, शामराव लक्षुमणजी निळकंठ.
,, शामराव विठोबा माडीक.
,, शामराव नारायण सोमने.
,, शामराव नारायण ढगे.
,, शामराव हरिश्चंद्र वारके.
,, शामराव बाबुलजी दिघे.
रा. शिवशंकर मलोजी चवाथे.
,, शिवशंकर कृष्णाजी शेट चंदन.
,, शिवशंकर भाई सासवडकर.
,, शिवशंकर नारायण मेंगळे.
,, शिवराम चिमाजी मेंगळे.
,, शिवराम पांडुरंग मुरंजण.
,, शिवराम वासुदेव बरवे.
,, शिवराम चितोबा कोरडे.
,, शिवराम सजन नाईक.
,, शिवराम धोंडुशेट ढगे नाळेकर.

**स.**

रा. सखाराम आबाजी गंध्रे.
,, सखाराम आबाजी डोळस.
,, सखाराम भिकाजी नाईक.
,, सखाराम हरिश्चंद्रजी निरगुडे.
,, सखाराम लक्षमण किरावंत.
,, सखाराम धोंडशेट नाईक.
,, सदाशिव बंभुजी चवाथे.
,, सदाशिव मुकुंदजी शेट दिघे.
,, सुकाजी सदोबा संत.

**ह.**

रा. हरिशंकर मोरोबा पतंगे (वकील).
,, हरि नारायण सोमने.
,, हरिशंकर बाळकृष्णजी भोजने.
,, हरी अंतोबा निरगुडे.
,, हरी पुतळाजी चवाथे.
,, हरिश्चंद्र दामोदर डोळस.
,, हरिश्चंद्र बाळाजी गंध्रे.
,, हरिबा गोविंदजी ढगे.
,, हरी जनार्दन शेट हंबीर.
,, हिराजी अंतोबा निरगुडे.
,, हिराजी लक्षुमण निरगुडे.
,, हिराजी काशिनाथ शेट शहाणे मरोळकर.

## सूचना.

पंचमंडळीच्या कामाकरितां, तसेंच ज्ञातींत शुभाशुभ प्रसंगीं आमंत्रणें इत्यादि करण्यास काईम मनुष्य पाहिजे ह्मणून त्या जागीं पंच मंडळीनें भवानी दामोदर भोजने यास नेमिलें आहे. त्याच्या वेतनाखेरीज त्यास ज्याकडे शुभकार्य असेल त्याजकडून रोजमुरा मिळाला पाहिजे. तसेंच अशुभ प्रसंगीं पहिला एक दिवस खेरीज करून इतर दिवसांची त्यास मेहनत मिळाली पाहिजे.

पंचमंडळीच्या हुकूमावरून,

ता. १९ माहे मे, सन १९८०. शिवशंकर मलोजी चवाथे,–चिटणीस.